# महाराष्ट्र विधानपरिषद

## पहिले अधिवेशन, २०२३

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**शुक्रवार, दिनांक २४ मार्च, २०२३ / चैत्र ३, १९४५ (शके)**

**(१) उप मुख्यमंत्री**
**(२) आदिवासी विकास मंत्री** — **यांचे प्रभारी विभाग**
**(३) बंदरे आणि खनिकर्म मंत्री**

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ३६**

---

## मुंबईतील शिवडी येथील सिंधुनगर संयुक्त झोपडपट्टी पुनर्विकास गृहनिर्माण प्रकल्प प्रलंबित असल्याबाबत

**(१) * १७७३० श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.रमेशदादा पाटील :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील झोपडपट्टी पुनर्विकास गृहनिर्माण योजनेंतर्गत ए.डी.मार्ग, रामटेकडी पथ, शिवडी येथील सिंधुनगर संयुक्त झोपडपट्टी पुनर्विकास गृहनिर्माण संस्था नियोजित हा प्रकल्प १९९६ साली पुनर्विकासाकरिता विकासकामार्फत हाती घेण्यात आला असून मागील ३० वर्षांपासून सदर प्रकल्प प्रलंबित असल्याचे माहे जानेवारी, २०२३ च्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकल्प सुरु करण्यासाठी विकासकाकडून सन २०१४ पासून टप्प्या-टप्प्याने झोपड्या रिकाम्या व निष्कासित करुन भूभाग मोकळा करण्यात आला असून प्रकल्पातील पात्र झोपडीधारकांना माहे जून, २०२१ महिन्यांपर्यंतचे रितसर घरभाडे धनादेशाद्वारे मिळाले, परंतु माहे जुलै, २०२१ पासून आजमितीपर्यंत रहिवाशांना घरभाडे मिळालेले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकल्प सुरु झाल्यानंतर सन २००९ साली सदर प्रकल्पाकरीता विकासकाला परिशिष्ट-२ प्राप्त झाले असतानाही आजमितीपर्यंत इमारतीचे कोणतेही बांधकाम सुरु झाले नसल्यामुळे प्रकल्पातील ८१७ कुटुंबाना रस्त्यावर राहण्याची वेळ आली असल्याचे समोर आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकल्पातील रहिवाशांना एसआरए, एम.एम.आर.डी.ए. किंवा म्हाडाच्या संक्रमण शिबिरातील घरे उपलब्ध करुन द्यावी त्याचप्रमाणे रखडलेल्या या प्रकल्पाचे शासनाने नव्याने आखलेल्या अभय योजनेंतर्गत पुनर्वसन करण्याच्यादृष्टीने विचार करावा अशी मागणी प्रकल्पाचे सभासदांकडून करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर प्रकल्पातील ८१७ कुटुंबांच्या निवासाची व्यवस्था करण्याकरिता सभासदांनी केलेल्या मागणीचा विचार करुन उक्त प्रकल्प शासनाच्या अभय योजनेंतर्गत समाविष्ट करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

सिंधुनगर संयुक्त झोपडपट्टी पुनर्विकास गृहनिर्माण संस्थेचे (नियोजित) विकासक मे. शेलाटकर कंस्ट्रक्शन प्रा.लि. यांना दिनांक ०४/०६/१९९६ रोजी प्रथम आशयपत्र देण्यात आले. तथापि, विकासकाने योजनेच्या आशयपत्रातील (LOI) व मंजूर आराखड्यामधील (IOA) काही अटी व शर्तींची पूर्तता न केल्याने तसेच सदर योजनेमध्ये विकासकामार्फत कोणतीही प्रगती होत नसल्याने झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने दिनांक १५/०६/१९९८ रोजी सदरची योजना दफ्तरी दाखल केली.

सन २००६ मध्ये विकासकाने प्रस्तुत झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्यासाठी नव्याने अर्ज केला. त्यास अनुसरुन सदरची योजना स्वीकारुन परिशिष्ट-२ जारी करण्यात आले. दिनांक १४/१२/२००९ रोजी विकासक योजनेच्या आशयपत्रातील (LOI) व मंजूर आराखड्यामधील (IOA) अटी व शर्तींची अद्यापही पूर्तता करीत नसल्याने संस्थेच्या सर्वसाधारण सभेमध्ये ठराव पारित करुन विकासक मे.शेलाटकर कंन्स्ट्रक्शन प्रा.लि. यांना बरखास्त करण्यात आले.

तद्नंतर संस्थेच्या विशेष सर्वसाधारण सभेतील ठरावाद्वारे (GBR) दिनांक १७/०१/२०१० रोजी सहायक निबंधक यांच्या समक्ष नवीन विकासक मे.सहाना प्रॉपर्टीज ॲण्ड रेसॉर्ट्स प्रा.लि. यांची नेमणूक करण्यात आली आहे. मात्र अद्यापपर्यंत योजनेतील इमारतीचे बांधकाम सुरु करण्यात आले नाही.

(२) हे खरे नाही.

प्रस्तुत योजनेत अंत:र्भूत असलेल्या ८ संस्थेतील पात्र सभासदांपैकी ज्या सभासदांनी आपल्या राहत्या झोपड्या पुनर्वसनासाठी निष्कासित करुन त्याचा ताबा विकासकास दिलेला आहे. त्या सभासदांना त्यांच्या दरमहा भाड्यापोटी जवळपास रुपये २४ कोटी इतके भाडे रहिवाश्यांच्या बँक खात्यात जमा केल्याचे झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने शासनास अवगत केले आहे.

(३) होय, हे अंशत: खरे आहे.

सदर योजनेत विकासकास दिनांक १४/०३/२००८ रोजी परिशिष्ट-२ जारी करण्यात आले होते.

सन २०१० मध्ये नवीन विकासकाची नेमणूक केल्यानंतर सन २०११ मध्ये आशयपत्र (LOI), २०१४ मध्ये पुनर्वसन इमारत क्र.१ चे मंजूर आराखडे (IOA) व २०१५ मध्ये जोत्यापर्यंतची बांधकाम परवानगी देण्यात आली होती. तथापि, विकासकाने प्रत्यक्ष जागेवर बांधकाम सुरु केले नाही.

विकासकाच्या विनंती अर्जानुसार, विकास नियंत्रण व प्रोत्साहनात्मक नियमावली, २०३४ नुसार सदर योजना रुपांतरीत करुन एकूण ८१३ झोपडपट्टीधारकांसाठी दिनांक १४/१०/२०१९ रोजी सुधारित आशयपत्र निर्गमित करण्यात आले.

त्यानंतर पुनर्वसन इमारत क्र.१,२ व ३ चे सुधारित आराखडे दिनांक ०९/०४/२०२१ रोजी जारी करण्यात आले. त्यानुसार पुनर्वसन इमारतींचे जोत्यापर्यंतचे बांधकाम प्रमाणपत्र मंजूर केले होते. तथापि, विकासकाने LOI व IOA मधील अटी व शर्तींची पूर्तता न केल्यामुळे व तिन्ही पुनर्वसन इमारतींचे जोत्यापर्यंतचे बांधकाम परवानगीसाठी (Plinth CC) भरावयाची देयक रक्कम वित्त विभाग (झोपुप्रा) यांच्याकडे अदा न केल्यामुळे सदरची Plinth CC निर्गमित करण्यात आलेली नाही. तथापि, पुनर्वसन इमारतीचे बांधकाम लवकरात लवकर सुरु करण्याच्या अनुषंगाने कालबध्द कार्यक्रम सादर करण्याबाबत विकासकास झोपुप्रा ने निर्देश दिले आहेत.

(४) हे खरे नाही.

अशी मागणी प्रकल्पाच्या सभासदांकडून झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे करण्यात आलेली नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नागपूर जिल्ह्यातील वागीगसाठी चांगल्या प्रतीचा कोळसा मिळत नसल्याबाबत

**(२) * १७७९५ श्रीमती उमा खापरे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.रमेशदादा पाटील, श्री.प्रवीण दटके, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.प्रसाद लाड, श्री.महादेव जानकर :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्ह्यातील वागीगसाठी (मालगाडीतील मालाचा डबा) दिलेल्या महाजनकोच्या चांगल्या कोळशामध्ये येसंबा (वराडा) येथील महा मिनरल माईनिंग ॲण्ड बेनीफिशिएशन प्रायव्हेट लिमिटेड कडून टाकाऊ साहित्य मिसळले जाते, हाच कोळसा रुपये १२ हजार प्रति टन दराने विकला जातो, त्यामुळे महाजनकोला पाठविण्यात येणारा कोळसा लाखो टनाने कमी येत असल्याची बाब माहे डिसेंबर, २०२२ च्या शेवटच्या आठवड्यात वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे खापरखेडा, कोराडी पॉवर प्लांट चे लोड फॅक्टर कमी होत असल्याने परिसरात धुळीचे प्रदूषण होत असतानाच महावितरणला चांगल्या प्रतीचा कोळसा मिळत नसल्याने विजेचे उत्पादन कमी होत असल्यामुळे महावितरणला राज्याला जास्त दराने विदयुत पुरवठा करावा लागतो, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने सविस्तर चौकशी करून अहवाल मागविला आहे काय,

(४) असल्यास, या अहवालानुसार शासनाने संबधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

महाराष्ट्र राज्य खनिकर्म महामंडळाने हिंद महा मिनरल एलएलपी यांना दिलेल्या कंत्राटानुसार नागपूर जिल्ह्यातील येसंबा (वराडा) या वॉशरीमध्ये धुतलेल्या कोळशाची वाहतूक ट्रक मधुन खापरखेडा व कोराडी विद्युत केंद्रासाठी होते. विद्युत केंद्रात प्राप्त झालेल्या वॉश कोलची तपासणी योग्य होण्यासाठी ऑगर मशीनचा वापर करण्यात येतो. त्या तपासणी अंती कोळशाची गुणवत्ता अपेक्षेप्रमाणे आढळून आलेली आहे. तसेच टाकाऊ साहित्य मिसळल्याचे निदर्शनास आलेले नाही.

(२) हे खरे नाही.

माहे नोव्हेंबर, २०२२ ते जानेवारी, २०२३ मध्ये खापरखेडा व कोराडी येथील ज्या संचाकरीता वॉश कोल वापरण्यात आला तेथील लोड क्षमता (Loadability) मध्ये सुधारणा झालेली आहे. तसेच माहे जानेवारी, २०२३ मध्ये लोड क्षमता (Loadability) मध्ये कोराडी ६६० मेगा वॅट- ८२.०८%, कोराडी २१० मेगा वॅट- ९३.६७% आणि खापरखेडा ५०० मेगा वॅट- ८२.५२% इतकी सुधारणा दिसुन आलेली आहे. तसेच दोन्ही पॉवर प्लांट ठरविलेल्या प्रदुषणाच्या मापदंडाच्या आत काम करित आहेत.

(३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## जुन्या मुंबई-पुणे राष्ट्रीय महामार्गावरील अपघात कमी करण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत

**(३) * १७६१३ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, श्री.जयंत आसगावकर, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, डॉ.प्रज्ञा सातव :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जुन्या मुंबई-पुणे राष्ट्रीय महामार्गावर बोरघाटात शिंग्रोबा मंदिराजवळ टेम्पो उलटून दिनांक ३१ डिसेंबर, २०२२ रोजी वा त्या सुमारास अपघात झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अपघाताची चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व पुढे कोणती कार्यवाही केली,

(३) असल्यास, या महामार्गावर वारंवार होणारे अपघात कमी करण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे आहे.

(२) दिनांक ३१ डिसेंबर, २०२२ रोजी खोपोली पोलीस ठाणे हद्दीत शिंग्रोबा मंदिराजवळ एका ट्रकचालकाने अतिवेगाने रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करून मोठ्या दगडास ठोकर मारून अपघात करून एका व्यक्तीच्या मृत्यूस व स्वत:च्या दुखापतीस कारणीभूत झाला.

ट्रक चालक याचेवर खोपोली पोलीस ठाणे येथे गुन्हा रजि.नं.४१७/२०२२ भा.द.वि. क.३०४ (अ), २७९, ३३७, ३३८ मोटार वाहन कायदा कलम १८४ प्रमाणे दिनांक ३१/१२/२०२२ रोजी गुन्हा दाखल करण्यात आलेला असून प्रकरण मा.न्यायालयात न्यायप्रविष्ट आहे.

(३) या महामार्गावर होणारे अपघात कमी करण्यासाठी शासनामार्फत खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येत आहेत.

- उपरोक्त महामार्गावर मेटल व कॉन्क्रीट क्रॅश बॅरीअर बसविले आहेत.
- वाहन चालकांना सूचना देणारे फलक लावण्यात आलेले आहेत.

- सदर महामार्गावर रिफ्लेक्टर स्ट्रीप्स लावण्यात आलेल्या असून पी.ए. सिस्टीममार्फत वाहन चालकांना सूचना देण्यात येत आहेत.
- अपघातप्रवण ठिकाणी वाहन चालकांना सूचना देण्यासाठी एलईडी लाईटचे बोर्ड लावण्यात आले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मनमोहाडी (ता.जव्हार, जि.पालघर) गावातील आदिवासी ग्रामस्थांना मूलभूत सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत

**(४) * १७२६७ श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मनमोहाडी (ता.जव्हार, जि.पालघर) येथील गावांची लोकसंख्या जवळपास १५० हून अधिक असून या गावातील आदिवासी ग्रामस्थांना अत्यावश्यक मूलभूत सोयी-सुविधा पुरविण्यात येत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील आदिवासींच्या विकासासाठी वीज, रस्ते, पाणी, मुलांना शिक्षण, आरोग्याच्या सुविधा, रोजगार यासाठी केंद्र व राज्य सरकारकडून कोट्यवधी रुपयांचा निधी मिळत असतानाही पालघर जिल्ह्यातील मनमोहाडी गाव-पाड्यातील गोरगरीब आदिवासींना गावात रस्त्याची कामे, तसेच अत्यावश्यक मूलभूत सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी शासनाने निधी उपलब्ध करून देण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावीत :** (१) व (२) पालघर जिल्ह्यातील ऐना ग्रामपंचायत अंतर्गत मनमोहाडी हे गाव येते. सदर गावात खालीलप्रमाणे मूलभूत सुविधा पुरविण्यात येत आहेत.

- सन २०१७ मध्ये १ रोहित्र (१०० के.व्ही.ए.) १० कि.मी उच्चदाब वाहिनी व ६ कि.मी लघुदाब वाहिनी द्वारे पूर्णत: विदयुतीकरण झालेले आहे.
- सदर गाव मनमोहाडी ते डोंगरपाडा या रस्त्याने जोडलेले आहे. याशिवाय रा.मा.क्र. ७७ ते मनमोहाडी रस्ता (लांबी २.५०० कि.मी.) या रस्त्याच्या कामास मुख्यमंत्री ग्रामसडक योजना टप्पा-२ सन २०२२-२०२३ अंतर्गत जिल्हा निवड समितीने मान्यता दिलेली आहे. सद्य:स्थितीस सदर रस्त्याच्या कामाचे सर्व्हेक्षणाचे काम कार्यकारी अभियंता, प्रधानमंत्री ग्राम सडक योजना, पालघर यांच्या कडुन प्रगतीत आहे.
- सदर गावासाठी दोन हातपंप तसेच एक पिण्याच्या पाण्याच्या विहीर द्वारे पाणीपुरवठा करण्यात येत आहे. तसेच जल जीवन मिशन योजनेंतर्गत सन २०२२-२३ मध्ये रुपये ३७.८३ लक्ष इतक्या रककमेचे काम मंजूर असून त्याचे कार्यादेश देण्यात आलेले आहेत
- मनमोहाडी येथील विद्यार्थी आश्रमशाळा झाप, ता.जव्हार येथे शिक्षण घेत आहेत.

- आरोग्य उपकेंद्र पाथर्डी व प्राथमिक आरोग्य केंद्र साकुर मार्फत मूलभूत आरोग्य सेवा पुरविण्यात येत असून सदर गावामध्ये आशा कार्यकर्ती नियुक्त करण्यात आलेली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मेळघाट (ता.धारणी, जि.अमरावती) मधील अति दुर्गम भागातील गावांमध्ये वीज उपलब्ध करून देण्याबाबत

**(५)** * **१७७२१ श्री.अंबादास दानवे, श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मेळघाट (ता.धारणी, जि.अमरावती) मधील अतिदुर्गम २४ गावांतील चार हजार आदिवासी नागरिक विजेअभावी अंधारात राहत असल्याची बाब दिनांक २ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मेळघाटातील २४ गावांतील आदिवासी नागरिक अजुनही वीज, पाणी, रस्ते, शिक्षण, आरोग्य, दळणवळणाच्या मूलभूत सोयी-सुविधांपासून वंचित आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाकडून आदिवासी भागासाठी कोटयवधी रुपयांच्या निधीची तरतुद करण्यात येत असतानाही मेळघाटातील रंगुबेली, चोपन, खोपमार, कुंड, किन्हीखेडा, रक्षा, खामदा, धोहखडा, चुनखडी, खडीमल, बिच्चुखेडा, नवलगांव, माखला, माळीझरप, मारीता, रायपूर, रेटाखेडा, सुमिता, सावरखेडा, घोराटयाखेडा, कुरीदा, पिपल्या, टेभक, बागवाई आदी गावांचा समावेश असून उक्त २४ गावांसाठी मंजूर करण्यात आलेल्या कामांना निधी मिळूनही वन विभागाची ना-हरकत प्रमाणपत्र न मिळाल्याने अनेक कामे प्रलंबित आहे तसेच प्रशासनाच्या उदासीन धोरणामुळे या गावांमध्ये वीज उपलब्ध झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन चौकशीच्या अनुषंगाने मेळघाटातील २४ गावांमध्ये वीज उपलब्ध करून देण्याबाबत तसेच जीवनावश्यक असलेल्या मूलभूत सुविधा व रोजगाराच्या संधी उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) हे खरे नाही.

मेळघाट मधील अतिदुर्गम २८ गावांमध्ये महाऊर्जामार्फत अपारंपारिक पध्दतीने विद्युतीकरण करण्यात आले आहे. तेथील एकूण २८ गावामध्ये एकूण ३५९८ संयंत्र आस्थापित करण्यात आले असून सदर संयंत्र सद्य:स्थितीत कार्यान्वित आहेत.

(३) हे अंशत: खरे आहे.

धारणी व चिखलदरा तालुक्यातील २८ गावात महाऊर्जामार्फत अपांरपारिक पध्दतीने विद्युतीकरण करण्यात आले आहे. महावितरणद्वारे मेळघाटमधील २४ गावांना पारंपारिक पध्दतीने विद्युतीकरण करण्यासाठी लागणाऱ्या रुपये ३६.९२ कोटी इतक्या निधीची मागणी एकात्मिक आदिवासी विकास विभाग, धारणी, जि.अमरावती यांच्याकडे करण्यात आली असून या २४ गावांपैकी पिपल्या व टेंम्भ्रु

या दोन गावांकरीता प्रादेशिक वनविभागाची परवानगी मिळालेली असून उर्वरित २२ गावे वन्यजीव विभागात येत असल्यामुळे त्याचे Wild Life Conservation act व Forest Conservation act अंतर्गत वन विभागाशी समन्वयाने वन परवानगीचे सुधारीत प्रस्ताव बनविण्याचे काम प्रगतीपथावर आहे.
(४) सदर २४ गावांपैकी पिपल्या व टेंम्भ्रु या दोन गावांकरीता प्रादेशिक वनविभागामार्फत परवानगी मिळालेली असून प्रकल्प अधिकारी आदिवासी विकास प्रकल्प, धारणी यांच्याकडून निधी प्राप्त करुन कामे कार्यान्वित करण्याचे नियोजित आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मेड्डीगट्टा (ता.सिरोंचा, जि.गडचिरोली) प्रकल्पाच्या बॅक वॉटरमुळे तालुक्यातील शेतकऱ्यांचे नुकसान होत असल्याबाबत

**(६) * १७४९३ श्री.रामदास आंबटकर, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.रमेशदादा पाटील :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गडचिरोली जिल्ह्यातील सिरोंचा तालुक्यातील मेड्डीगड्डा प्रकल्पाच्या बॅक वॉटरमुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होत असल्याने तालुका कार्यालयासमोर शेतकऱ्यांनी बेमुदत उपोषण सुरु केले असल्याचे माहे डिसेंबर, २०२२ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर बॅक वॉटरमुळे शेतकऱ्यांचे नुकसान होत असून व भूसंपादनाच्या प्रश्नांवर नुकसान भरपाई देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.
(२) मेडीगड्डा बॅरेजमुळे बुडीत क्षेत्रात (बॅक वॉटर भागात) येणाऱ्या जमिनीचे भूसंपादन पूर्ण संचय पातळी १००.०० मी. च्या अनुषंगाने महाराष्ट्र राज्यातील एकूण १८ गावांतील आवश्यक ३६९.१३ हे. खाजगी जमिनीपैंकी २३४.९२ हे. खाजगी जमीन संपादीत करण्यात आलेली असून उर्वरित जमीन संपादनाची कार्यवाही भूमी संपादन अधिनियम, २०१३ अन्वये उपविभागीय अधिकारी (राजस्व) अहेरी, गडचिरोली यांचेमार्फत प्रगतीत आहे.

सिरोंचा तालुक्यातील संबंधित भूधारकांनी डिसेंबर, २०२२ मध्ये तहसिल कार्यालयासमोर जमिनीसाठी अधिक दर मिळण्यासाठी उपोषण केले होते. त्या भागात खरेदी/विक्रीचे दर तथा शिघ्र गणक (Ready Reckoner) चे दर कमी आहेत. त्यामुळे एकूण १२ गावातील १२८.०४ हे. आर. खाजगी जमिनीचा मोबदला दर निश्चित करणेसाठी शासन स्तरावर दर ठरविण्याबाबत जिल्हाधिकारी, गडचिरोली यांनी महसूल व वन विभागास सादर केलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने महसूल व वन विभागाचे दिनांक २८ डिसेंबर, २०२२ च्या पत्रान्वये यापूर्वी थेट खरेदीने ताब्यात घेतलेल्या २३४.९२ हे.आर. जमीनीला देण्यात आलेले मुल्यांकन विचारात घेऊन उर्वरित बुडीत क्षेत्र १२८.०४ हे. आर. करीता भूधारकास वाजवी व न्याय मोबदला देण्याच्यादृष्टीने कलम २३ (क) मधील तरतूदीनुसार संमती निवाडा करुन भूसंपादन

प्रक्रिया तातडीने पूर्ण करण्यात यावी असे निदेश देण्यात आले. त्यानुसार, उपविभागीय अधिकारी, अहेरी यांच्याकडून सदरील जमीन संपादनाबाबत संमती निवाडा पारित करण्याची कार्यवाही प्रगतीपथावर सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## जळगाव जिल्हा पोलीस दलाने जिल्ह्यातील विविध उपविभागीय अधिकाऱ्यांकडे पाठविलेले हद्दपारीचे प्रस्ताव प्रलंबित असलेबाबत

**(७) * १७६४५ श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जळगाव जिल्ह्यामध्ये पोलीस दलाने जिल्ह्यातील विविध उपविभागीय अधिकाऱ्यांकडे पाठविलेले हद्दपारीचे १०० प्रस्ताव बऱ्याच कालावधीपासून प्रलंबित आहेत, हे खरे आहेत काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने हद्दपारीचे प्रलंबित प्रस्तावांवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) सद्य:स्थितीत जळगाव जिल्ह्यामध्ये हद्दपारीचे ३९ प्रस्ताव उपविभागीय अधिकाऱ्यांकडे प्रलंबित आहेत. यामधील २१ प्रस्ताव उपविभागीय अधिकाऱ्यांकडे चौकशीसाठी प्रलंबित असून उर्वरित १८ प्रस्तावांमध्ये संबंधितांची बाजू ऐकून घेणेकामी सुनावणीचे काम सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## आदिवासी समाजाच्या अडचणी सोडविण्यासाठी जनजाती सल्लागार परिषदेच्या बैठका घेण्याबाबत

**(८) * १७८५१ श्री.प्रवीण दटके : तारांकित प्रश्न क्रमांक १६३७८ ला दिनांक २२ डिसेंबर, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भारतीय राज्यघटनेच्या अनुसूचीनुसार राज्यात जनजाती सल्लागार परिषदेच्या वर्षातून किमान चार बैठका होणे अनिवार्य असताना मागील चार वर्षात एकही बैठक झालेली नसल्याची बाब माहे जानेवारी, २०२३ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, संविधानाच्या पाचव्या अनुसूचीतील भाग-ख मधील परिच्छेद ४(१) नुसार राज्यामध्ये आदिवासी समाज कल्याणाच्या योजना धोरण कार्यक्रमाचे नियमन आणि आदिवासींच्या विकासाच्या संदर्भातील विचारलेल्या विषयांच्या बाबतीत कार्य करण्यासाठी सल्लागार परिषद अस्तित्वात आणण्याचे निर्देशित केले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, आदिवासींच्या अडचणी सोडविण्यासाठी बैठका घेण्याची लोकप्रतिनिधींनी लेखी मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने आदिवासींच्या अडचणी सोडविण्यासाठी बैठका घेण्याबाबत तसेच जनजाती सल्लागार परिषदेची पुनर्रचना करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावीत :** (१) दिनांक २९ ऑगस्ट, १९६० च्या शासन निर्णयान्वये जनजाती सल्लागार परिषदेची (TAC) बैठक सर्वसाधारणपणे ६ महिन्यातून एकदा घेणे आवश्यक आहे.

जनजाती सल्लागार परिषदेची शेवटीची ५० वी बैठक दिनांक ११ फेब्रुवारी, २०१९ रोजी घेण्यात आली होती. त्यानंतर राज्यात उद्भवलेल्या कोरोना विषाणुच्या प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर बैठका घेण्यास बंदी असल्याने जनजाती सल्लागार परिषदेची (TAC) बैठक झालेली नाही. यानंतर कोरोना विषाणुचा प्रादुर्भाव कमी झाल्यानंतर दिनांक २३ जून, २०२२ रोजी बैठक आयोजित करण्यात आली होती. परंतु, काही अपरिहार्य कारणामुळे सदर बैठक रद्द करण्यात आली.
(२) होय, हे खरे आहे.
(३) होय, हे खरे आहे.
(४) सद्य:स्थितीत दिनांक ५ जानेवारी, २०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये जनजाती सल्लागार परिषदेची पुनर्रचना करण्यात आलेली आहे.

जनजाती सल्लागार परिषदेची (TAC) बैठक आयोजित करण्याचे प्रस्तावित आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्य शासनाच्या विविध विभागांचा निधी अखर्चित राहिल्याबाबत

**(९) * १७६२९ श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्याचा सन २०२२-२०२३ चा अर्थसंकल्प रूपये ५ लाख कोटीहून अधिक असून माहे जानेवारी, २०२३ च्या पहिल्या आठवड्यापर्यंत विविध विभागांना रूपये ४ लाख ४८ हजार ९२९ कोटी एवढा निधी वितरीत केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास राज्य शासनाच्या विविध विभागांना वितरीत केलेल्या निधीपैकी रूपये ३ लाख ४६ हजार १३८ कोटी खर्च केले असून अजुनही रूपये १ लाख ०२ हजार ७९१ कोटी एवढा निधी अखर्चित आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर निधी अखर्चित राहण्याची कारणे काय आहेत, तसेच विविध विभागांचा निधी अखर्चित राहू नये यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) होय.

(३) संबंधित प्रशासकीय विभागांकडून उपलब्ध निधीतून त्यांच्या आवश्यकतेनुसार खर्च केला जातो. प्रशासकीय विभागांनी उपलब्ध करुन दिलेल्या निधीतून खर्चाचे योग्यरित्या नियोजन करण्याबाबत वित्त विभागाकडून वेळोवेळी निदेश देण्यात आलेले आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील न्यायसहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळेमधील रिक्त पदे भरणेबाबत

**(१०) * १७७२८ डॉ.प्रज्ञा सातव : तारांकित प्रश्न क्रमांक १२३३३ ला दिनांक ७ मार्च, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील न्यायसहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळे मध्ये गट- अ संवर्गातील ३१ पदे व गट- ब संवर्गातील ५४ पदे रिक्त आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे बालके व महिलांसंबंधीच्या गुन्हयांच्या डीएनए चे शेकडो नमूने चाचणीविना प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने निर्णय घेवून सदर प्रयोगशाळांमधील रिक्त पदे तातडीने भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

(२) राज्यातील सर्व न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळांमधील बालंकावरील लैंगिक अत्याचार (पोक्सो) संबंधी वर्षे २०२२ मध्ये दाखल व त्यापूर्वी प्रलंबित अशा एकूण ६०९४ प्रकरणांपैकी माहे जानेवारी, २०२३ पर्यंत ४२७० प्रकरणांचा अहवाल निर्गमित करण्यात आला असून माहे जानेवारी, २०२३ अखेर १८२५ प्रकरणे प्रलंबित आहेत.

महिलांवरील गुन्हयासंबंधी डीएनएबाबत (३७६ IPC) वर्षे २०२२ मध्ये दाखल व त्यापूर्वी प्रलंबित अशा एकूण २४८३ प्रकरणांपैकी माहे जानेवारी, २०२३ पर्यंत १२२१ प्रकरणांचे अहवाल निर्गमित करण्यात आले असून माहे जानेवारी, २०२३ अखेर १२६२ इतकी प्रकरणे प्रलंबित आहेत.

(३) गट-असंवर्गातील विविध संवर्गाचे २९ पदांचे मागणीपत्र तसेच गट-ब संवर्गातील ५० विविध पदांचे मागणीपत्र महाराष्ट्र लोकसेवा आयोगास पाठविण्यात आले आहे. सदर मागणीपत्राच्या अनुषंगाने महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून गट-अ मधील उपसंचालक संवर्गातील ५ उमेदवारांची व गट-ब मधील वैज्ञानिक अधिकारी (सायबर गुन्हे, ध्वनी व ध्वनीफित विश्लेषण) संवर्गातील १७ उमेदवारांची शिफारसपत्रे शासनास प्राप्त झाली आहेत. सदर उमेदवारांना नियुक्ती देण्याची प्रक्रीया सुरु आहे.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडे सादर करण्यात आलेल्या उर्वरीत संवर्गातील मागणीपत्रांच्या अनुषंगाने महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून शिफारस पत्रे प्राप्त झाल्यानंतर नियुक्ती देण्याची कार्यवाही करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अलिबाग (जि.रायगड) तालुक्यातील भूमिगत विद्युत वाहिन्या टाकतेवेळीस रस्त्यांसह इतर मालमत्तेचे नुकसान होत असल्याबाबत

**(११) * १६९८१ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अलिबाग (जि.रायगड) नगरपरिषद हद्दीमधील राष्ट्रीय चक्रीवादळ धोके निवारण प्रकल्पांतर्गत भूमिगत विद्युत प्रकल्प प्रणालीचे काम संथगतीने चालू असून या प्रकल्प प्रणालीमध्ये चेंढरे व वरसोली गावांचाही पूर्णतः समावेश करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, भूमिगत केबल टाकण्यासाठी ट्रॅचिंग व ट्रॅच लेस जमिनीत आडवे ड्रिलिंग करून भूमिगत वाहिन्या टाकल्या असतानाही चेंढरे व वरसोली ग्रामपंचायत हद्दीमध्ये रस्ता खोदून भूमिगत विदयुत वाहिनी टाकून सदर रस्ता हा माती-दगड भराव करून बुजविण्यात आला आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सबब चेंढरे व वरसोली या ग्रामपंचायत हद्दीतील नुकतेच नव्याने दुरूस्त करण्यात आलेले रस्ते खोदून सदर रस्ते नादुरूस्त करण्याचे काम सदर ठेकेदाराने केल्याने सदर ग्रामपंचायतीसह शासनाचे आर्थिक व सार्वजनिक दळणवळण मालमत्तेचे नुकसान केले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, वीज पुरवठा सुरळीत रहावा म्हणून राष्ट्रीय चक्रीवादळ जोखीम उपशमन प्रकल्पांतर्गत अलिबाग नगरपालिका आणि बाजूच्या चेंढरे आणि वरसोली ग्रामपंचायत क्षेत्रातील विद्युत पुरवठा लीना पॉवरट्रेक इंजिनियर्स प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीद्वारे भूमिगत वीज वाहिनी टाकण्यात येणार होती, परंतु सहा वर्षे उलटूनही सुमारे ८३ कोटींची योजना पूर्ण झालेली नाही, तसेच या कामाला माहे मार्च, २०२२ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती, मात्र हे काम वेळेत पूर्ण न झाल्याने पुन्हा मुदतवाढ देण्याची मागणी संबंधित कंपनीने केली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर प्रकरणी दोषी असलेल्या ठेकेदाराकडून नादुरूस्त झालेले सर्व रस्ते नव्याने तयार करून घेण्यासाठी तसेच झालेल्या नुकसानीची भरपाई देण्याबाबत तसेच सदर भूमिगत वीज वाहिन्यांचे काम जलदगतीने पूर्ण होण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे अंशत: खरे आहे.

सदर कामाचे कार्यादेश दिनांक १३/०९/२०१९ रोजी दिलेले असून कोविड-१९ या रोगाच्या प्रभावामुळे कामाचा वेग मंदावला होता. सदर काम संथगतीने चालू असल्यामुळे या बाबतची सुचना ठेकेदाराला देण्यात आली आहे व स्टेट प्रोजेक्ट इंप्लिमेंटेशन युनिट (SPIU), राष्ट्रीय चक्रीवादळ धोके निवारण प्रकल्प (NCRMP) कक्ष ला योग्य कार्यवाही करण्याची विनंती करण्यात आलेली आहे. सदर प्रकल्पामध्ये चेंढरे गाव व वरसोली गावाचे काही भागांची कामे समाविष्ट केलेली आहेत.

(२) हे खरे आहे.

खोदाई करण्यात आलेले रस्ते माती दगड भराव करुन बुजविण्यात आल्याचे निदर्शनास आलेले आहे.

(३) हे खरे नाही.

ग्रामपंचायतीकडून सदरच्या अंतर्गत रस्त्यांची तात्पुरती दुरुस्ती ग्रामपंचायती स्तरावर करुन घेऊन रस्ते दळणवळणसाठी वापरात दिसतात.

(४) हे अंशत: खरे आहे.

सदर कामाचे कार्यादेश दिनांक १३/०९/२०१९ रोजी दिलेले असून योजना रुपये ८९.५३ कोटींची आहे. आजपर्यंत रुपये ६९.८८ कोटीचे काम पूर्ण झालेले आहे. सदर काम पूर्ण करण्यासाठी शासनाने मे.लीना पॉवरटेक इंजिनियर्स प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीस दिनांक १४ मार्च, २०२३ पर्यंत मुदतवाढ दिलेली आहे.

(५) चेंढरे आणि वरसोली ग्रामपंचायत हद्दीतील रस्ता पुन:स्थापना/दुरुस्तीची कामे पूर्ण झालेली असून संबंधित ग्रामपंचायती कडून सदर कामांचे ना-हरकत दाखले संबंधित ठेकेदाराला मिळाले आहेत. राष्ट्रीय चक्रीवादळ धोके निवारण प्रकल्प-२ अंतर्गत काम प्रगतीपथावर असून विहित मुदतीत पूर्ण करण्याकरीता ठेकेदाराला महावितरण कंपनीने वेळोवेळी सूचना दिलेल्या आहेत.

-----------------

## धायरी (जि.पुणे) येथील विवाहित महिलेला स्मशानभूमीतील राख पाण्यातून दिल्याची घटना घडण्याबाबत

**(१२)** * **१७९७० श्री.महादेव जानकर :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुण्यातील धायरी येथे राहणाऱ्या संगणक ऑपरेटर असलेल्या विवाहित महिलेला मुलबाळ होत नसल्यामुळे आणि घरात आर्थिक सुबत्तेसाठी स्मशानभूमीतील राख पाण्यातून दिल्याची घटना नुकतीच माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर महिलेने नकार दिल्यावर तिला पिस्तुलाचा धाक दाखवून हाडांची पावडर खाण्यास दिल्याचा अघोरी प्रकार घडला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर अघोरी प्रथेप्रकरणी संबंधितांवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत,

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

(२) होय.

(३) सदर प्रकरणी सिंहगड रोड पोलीस स्टेशन जि.पुणे गु.र.नं. ४३/२०२३ भादवि कलम ४९८(अ), ३२३, ५०४, ५०६(२), ३४ सह महाराष्ट्र नरबळी आणि इतर अमानुष, अनिष्ठ व अघोरी प्रथा व जादुटोणा करण्याबाबत अधिनियम, २०१३ चे कलम ३ प्रमाणे दिनांक १८/०१/२०२३ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्याचा तपास सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील धर्मादाय आयुक्त कार्यालयांतील ऑनलाईन कामकाज प्रक्रियेत अडचणी येत असल्याबाबत

**(१३)** * **१८२६७ श्री.श्रीकांत भारतीय :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यामधील धर्मदाय आयुक्त कार्यालयात अपील दाखल करणे, बदल अर्ज दाखल करणे, नवीन संस्था व ट्रस्ट नोंदणी करणे, शेड्युल अपडेट करणे, हिशोब दाखल करणे इत्यादी सर्व कामे ही ऑनलाईन करण्याचा निर्णय घेण्यात आल्याचे समजते ही बाब खरी आहे काय,
(२) असल्यास, संबंधित कार्यालयामधे यासाठी आवश्यक असलेली यंत्रणा (संगणक, सर्व्हर, स्कॅनर, प्रिंटर, इंटरनेट सुविधा इ. उपलब्ध नसून त्यामुळे नागरिकांची प्रचंड गैरसोय होत असून त्यांचे आर्थिक नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने प्रकरणे ऑनलाईन दाखल केल्यानंतर देखील त्याची प्रत संबंधित कार्यालयात सर्व कागदपत्रांसहित दाखल करावी लागत असून उक्त गैरसोय टाळण्यासाठी शासन स्तरावर कोणत्या उपाययोजना केल्या आहेत अथवा विचाराधीन आहेत,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे अंशः खरे आहे. धर्मादाय आयुक्त कार्यालयाचे परिपत्रक क्र. ६०१ दिनांक २७/१२/२०२२ नुसार संस्था नोंदणी व न्यास नोंदणी या दोन सेवा केवळ ऑनलाइन स्वरुपात स्वीकारण्यात येत आहेत. बदल अर्ज हे ऑफलाईन/ ऑनलाईन अशा दोन्ही पध्दतीने स्वीकारले जात आहेत. हिशोबपत्रके ऑनलाइन पध्दतीनेच स्वीकारण्यात येत आहेत.
(२) हे खरे नाही. सद्य:स्थितीत धर्मादाय संघटनेच्या कार्यालयांमध्ये उपलब्ध असलेल्या संगणक, प्रिंटर व इतर यंत्रणाद्वारे ऑनलाईन सुविधांचे कामकाज व्यवस्थितपणे सुरु आहे.
(३) हे खरे नाही. विधिज्ञ/ पक्षकार नागरिकांना गैरसोय होऊ नये ह्याची दक्षता घेतली जात आहे. धर्मादाय कार्यालयातील प्रकरणे अर्ध न्यायिक (quasi judicial) स्वरुपाची असल्याने मूळ दस्तवेज सादर करणे बंधनकारक आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील महावितरणचे सदोष वीज मीटर बदलण्याबाबत

**(१४) * १८४६० श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील महावितरणच्या सुमारे १४ लाख ८६ हजार ३५१ ग्राहकांचे वीज मीटर खराब असल्याची ६९ टक्के रिडिंग सदोष असल्याची तसेच ४ टक्के ग्राहकांना सरासरी वीज देयके पाठविण्यात येत असल्याची बाब दिनांक १३ फेब्रुवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले आहे आणि राज्यातील महावितरणचे सदोष वीज मीटर तातडीने बदलून वीज ग्राहकांना दिलासा देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहेत,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे अंशत: खरे आहे.

महावितरणचे राज्यात सुमारे २ कोटी ४८ लाख लघुदाब अकृषक ग्राहक आहेत. या सर्व ग्राहकांची वीज देयके त्यांच्या मीटरच्या वापराप्रमाणे देण्यात येतात. वीज मीटर हे इलेक्ट्रॉनिक उपकरण असल्यामुळे त्यामध्ये विविध कारणाने बिघाड होण्याची शक्यता असते. अशी नादुरुस्त मीटर बदलण्याची प्रक्रिया निरंतर सुरु असते. ग्राहकांचे मीटर नादुरुस्त असणाऱ्या काळात मा.महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने ठरवून दिलेल्या निकषाप्रमाणे त्यांच्या पूर्वीच्या वापरावर आधारित सरासरी देयक देण्यात येते. जानेवारी, २०२३ मध्ये सुमारे ८९.९०% ग्राहकांना त्यांच्या मीटरच्या नोंदीप्रमाणे देयक देण्यात आली आहेत. उर्वरित ६.५ % ग्राहकांना (१६.१८ लक्ष) मीटर नादुरुस्त असल्यामुळे तसेच ३.६% ग्राहकांना मीटर वाचन उपलब्ध न झाल्यामुळे सरासरी वापरावर आधारित देयक देण्यात आले आहे.

(२) महावितरणला नवीन वीज जोडणी तसेच जुने व नादुरुस्त मीटर बदलण्यासाठी प्रतिवर्षी साधारणत: २० लक्ष सिंगल फेज व दोन लक्ष थ्री फेज मीटरची आवश्यकता भासते. यासाठी महावितरणमार्फत नियमितपणे सिंगल व थ्री फेज मीटरची खरेदी ई-निविदेच्या माध्यमातून करण्यात येते. महावितरणमार्फत ई-निविदाअंतर्गत पूरवठादारांना माहे मार्च-२०२२ मध्ये १५ लक्ष, जानेवारी-२०२३ मध्ये ३ लक्ष सिंगल फेज व माहे मे-२०२२ मध्ये १.५ लक्ष नग इतक्या नवीन थ्री फेज वीज मीटरच्या पुरवठ्याचे कार्यादेश देण्यात आले होते. सदर पुरवठादारांकडून सन २०२२-२३ दरम्यान आजमितीस १४,४५,००० सिंगल फेज व १,३३,००० थ्री फेज वीज मीटर क्षेत्रिय कार्यालयांना पुरविण्यात आले आहेत. आर्थिक वर्ष २०२१-२२ मध्ये ६.९४ लक्ष नादुरुस्त मीटर बदलण्यात आलेले आहेत. तसेच आर्थिक वर्ष २०२२-२३ मध्ये एकूण ५.९० लक्ष नादुरुस्त मीटर बदलण्यात आलेले असून उर्वरित नादुरुस्त मीटर बदलण्याचे काम प्रगतीपथावर आहे. नादुरुस्त मीटर बदलण्याची प्रक्रिया ही निरंतर कायमस्वरुपी चालू असते.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## झोपडपट्टी पुनर्वसन योजनेंतर्गत पात्र लाभार्थ्यांला हक्काच्या घरापासून वंचित ठेवलेबाबत

**(१५) * १८४७० श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) झोपडपट्टी पुनर्वसन योजनेंतर्गत पात्र असतानाही घर मिळत नसल्यामुळे वांद्रे येथील झोपडपट्टी पुनर्वसन योजनेच्या कार्यालयाबाहेर दिनांक १० फेब्रुवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास एका इसमाने आत्मदहन करण्याचा प्रयत्न केला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले आहे आणि सदर प्रकरणी पात्र लाभार्थ्यांला हक्काच्या घरापासून वंचित ठेवणाऱ्या झोपडपट्टी पुनर्वसन योजनेच्या संबंधित अधिकारी / कर्मचाऱ्यांवर कोणती कारवाई केली तसेच लाभार्थ्याला घर मिळणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

(२) मौजे कोलेकल्याण, ता.अंधेरी येथील मोतीलाल नेहरु नगर सह.गृह.संस्थेच्या पुनर्वसन इमारतीमध्ये (१) श्री.रशिद अहमद शहा (२) श्रीमती जैयतुन शहा (३) श्रीमती शेहनाज रशिद शहा (४) श्रीमती खुशबुन्नीसा कबीर शहा (५) श्री.अन्वर अली शहा (६) श्री.सगीर अहमद रशिद शहा या ०६ अनधिकृतपणे वास्तव्य करणाऱ्या व्यक्तींचे निष्कासन करणेकामी सहायक निबंधक, सहकारी संस्था (प.उ.), झोपुप्रा यांनी दिनांक १२/१२/२०१९ रोजीच्या पत्रान्वये उपजिल्हाधिकारी (मुंबई शहर) झोपुप्रा विभागाकडे अहवाल पाठविला आहे.

त्यानुसार महाराष्ट्र झोपडपट्टी (सु.नि. व पु.) अधिनियम, १९७१ च्या कलम ३३ नुसार उपजिल्हाधिकारी, (मुंबई शहर) झोपुप्रा यांच्याकडे सुनावण्या घेण्यात आल्या आहेत.

तद्नंतर दिनांक ०२/०२/२०२२ रोजीच्या पत्राने विशेष कक्ष-१, झोपुप्रा विभागामार्फत सक्षम प्राधिकारी-३, झोपुप्रा यांचे कार्यालयाकडे महाराष्ट्र झोपडपट्टी (सु.नि. व पु.) अधिनियम, १९७१ च्या कलम ३ ई नुसार ६ व्यक्तींविरुध्द निष्कासनाची कार्यवाही करण्याबाबत कळविण्यात आले आहे.

परंतु, सक्षम प्राधिकारी-३, झोपुप्रा कार्यालयाने दिनांक २७/०६/२०२२ रोजीच्या पत्रान्वये सदर प्रकरण कलम ३ई अंतर्गत येत नसून सदर प्रकरण तहसिलदार-१ (विशेष कक्ष) झोपुप्रा या विभागाकडे पुन:श्च कलम ३३ नुसार कारवाईसाठी पाठविले आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपुप्रा यांनी सदर प्रकरणी कलम ३३ अन्वये पुढील कारवाई करण्याकरीता दिनांक १५/०९/२०२२ रोजी मान्यता दिली आहे.

सदर प्रकरणी दिनांक १०/०२/२०२३ रोजी सुनावणी घेण्यात आली असून पुढील सुनावणी दिनांक ०८/०३/२०२३ रोजी ठेवण्यात आली आहे. सदर बाब ही अर्धन्यायिक स्वरुपाची असून अजुनही निष्कासन झालेले नाही. त्यामुळे अधिकारी/कर्मचाऱ्यांवर कोणतीही कारवाई करण्याचा प्रश्न येत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## जुन्नर (जि.पुणे) तालुक्यातील डावखरवाडी ते दरेवाडी तसेच बांबळेवाडी ते दरेवाडी येथील रस्त्यांची कामे करण्याबाबत

**(१६) * १८४७९ श्री.रमेशदादा पाटील :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जुन्नर (जि.पुणे) तालुक्यातील मौजे तांबे येथील डावखरवाडी ते दरेवाडी (वाजेवाडी) तसेच बांबळेवाडी ते दरेवाडी याठिकाणी ग्रामीण भागात वाहतुकीस रस्ता नसल्याकारणामुळे रुग्ण, शालेय विद्यार्थी, वृद्ध नागरिक व ग्रामस्थांची दळणवळणाच्यादृष्टीने गैरसोय होत असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर ठिकाणच्या ग्रामस्थांना दैनंदिन व अत्यंत तातडीच्या कामांकरीता रस्त्यांअभावी वाहतूक व्यवस्था नसल्याकारणाने पाऊलवाटेने पायीच प्रवास करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर ग्रामीण भागात वाहतुकीकरीता रस्ता बनविण्याबाबत ग्रामस्थ नागरिक व लोकप्रतिनिधींनी शासनाकडे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार डावखरवाडी ते देरेवाडी आणि बांबळेवाडी ते देरेवाडी याठिकाणी वाहतुकीच्यादृष्टीने डांबरीकरण रस्त्यांची कामे करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावीत :** (१), (२), (३) व (४) रस्त्याअभावी ग्रामस्थांना अडचणींचा सामना करावा लागत असल्याने या भागामध्ये लेखाशीर्ष ३०५४ २७२२ अंतर्गत रस्ते मंजूर करण्याची विनंती लोकप्रतिनिधींनी केली होती. त्यानुषंगाने शासन निर्णय दिनांक १६/०२/२०२३ अन्वये तांबे ते तांबेवाडी (देरेवाडी) तसेच तांबे ते बांबळेवाडी या रस्त्याच्या कामांना मंजूरी देऊन निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे. त्यानुसार जिल्हा परिषद, पुणे यांच्यामार्फत अंमलबजावणी करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## चंद्रपूर जिल्ह्यातील आदिवासी विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती अदा करण्यासाठी कार्यवाही करणेबाबत

**(१७) * १८५०९ श्री.सुधाकर अडबाले, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चंद्रपूर जिल्ह्यात शासनामार्फत दिल्या जाणाऱ्या शिष्यवृत्तीपासून आदिवासी विद्यार्थी गेल्या दोन वर्षांपासून वंचित आहेत व शिष्यवृत्ती मिळत नसल्याने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, विद्यार्थ्यांना महाविद्यालयातून शुल्क प्रतिपूर्तीसाठी सतत मागणी करण्यात येत असल्याने विद्यार्थी पुढील शिक्षण घेण्यापासून वंचित होत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने निर्णय घेऊन शिष्यवृत्तीच्या निधीची तरतूद करुन सदर विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती अदा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावीत :** (१) अंशत: खरे आहे.

सन २०२१-२०२२ व २०२२-२०२३ या शैक्षणिक वर्षामध्ये व्यावसायीक अभ्यासक्रमाचे शुल्क निश्चीती शिक्षण शुल्क समिती, मुंबई यांनी विलंबाने केल्याने विद्यार्थ्यांचे अर्ज माहे मे, २०२२ नंतर आयुक्तालय स्तरावर प्राप्त झाले आहे. महाडीबीटी पोर्टलवरुन पात्र विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती अदा करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(२) हे खरे नाही.
(३) प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, चंद्रपूर अंतर्गत सन २०२१-२२ या शैक्षणिक वर्षामध्ये ४६४४ व सन २०२२-२३ या शैक्षणिक वर्षामध्ये २६७९ पात्र विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मंजूर करण्यात आली असून महाडीबीटी पोर्टलमार्फत शिष्यवृत्ती अदा करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बालरोग परिचारिका या पदाबाबत बक्षी समिती खंड-२ मधील स्वीकृत शिफारशीनुसार ७ व्या वेतन आयोगाच्या सुधारित वेतनश्रेणीत तफावत असल्याबाबत

**(१८) * १८६३२ ॲड.अनिल परब :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वैदयकीय शिक्षण आणि औषधी द्रव्ये विभागांतर्गत कार्यरत बालरोग परिचारिका यांच्या तुलनेत सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत कार्यरत बालरोग परिचारिका यांच्याबाबतीत बक्षी समिती खंड-२ मधील स्वीकृत शिफारशींनुसार ७ व्या वेतन आयोगाच्या सुधारित वेतनश्रेणीतील तफावत असल्याचे नुकतेच माहे फेब्रुवारी, २०२३ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्य शासनाने स्वीकृत केलेल्या राज्य वेतन सुधारणा समिती २०१७ च्या खंड -२ मधील शिफारशींनुसार वैदयकीय शिक्षण आणि औषधी द्रव्ये विभागांतर्गत कार्यरत बालरोग परिचारिका यांना सदर आयोगाच्या वेतनश्रेणीनुसार एस-१४ ऐवजी एस-१६ अशी सुधारित वेतनश्रेणी मंजूर करण्यात आलेली असताना सार्वजनिक आरोग्य विभागातंर्गत कार्यरत बालरोग परिचारिका यांना कार्य व जबाबदारी सारखी असतानाही शासन निर्णय राज्य वेतन सुधारणा समिती-२०१७ मध्ये वगळण्यात आलेले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्य शासनाच्या दोन वेगवेगळया विभागात एकाच पदावर कार्यरत बालरोग परिचारिका यांना वेगवेगळी वेतनश्रेणी लागू होत असल्याने दिनांक १३ फेब्रुवारी,२०२३ रोजीचा शासन निर्णय क्रमांक : वेपुर ११२१/प्र.क्र.४/सेवा ९ मध्ये सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत कार्यरत बालरोग परिचारिका यांच्यावर अन्याय करण्यात आलेला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, वैदयकीय शिक्षण आणि औषधी द्रव्ये विभागांतर्गत कार्यरत बालरोग परिचारिका यांच्याप्रमाणे सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत कार्यरत बालरोग परिचारिका या शासनाच्या दोन वेगवेगळया विभागात एकाच पदावर कार्यरत असून दोन्ही विभागातील सदर पदास एस-१६ अशी सुधारित एकसमान वेतनश्रेणी लवकरात लवकर मंजूर करण्यात यावी व समान काम समान वेतन या तत्वानुसार होणारा अन्याय व भेदभाव दूर करण्याच्यादृष्टीने शासन स्तरावर काय कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे आहे.
(२), (३), (४) व (५) सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत कार्यरत असलेल्या बालरोग परिचारीका यांच्या वेतनश्रेणीत सुधारणा करण्याबाबत त्यांच्या संवर्गाकडून राज्य वेतन सुधारणा समितीसमोर कोणतीही मागणी नोंदविण्यात आलेली नव्हती. त्यामुळे समितीने त्यांच्या संवर्गाबाबत कोणतीही शिफारस केलेली नसल्याने शासन स्तरावर याबाबत कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नागपूर येथे शेअर्समध्ये गुंतवणूक करुन चांगला नफा मिळवून देण्याच्या नावांखाली तीन गुंतवणुकदारांची २०.९० कोटी रुपयांची फसवणुक करण्यात आल्याबाबत

**(१९) * १८७१० श्री.अभिजित वंजारी :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथे शेअर्समध्ये गुंतवणूक करुन चांगला नफा मिळवून देण्याच्या नावांखाली तीन गुंतवणुकदारांची रूपये २०.९० कोटींची फसवणूक करण्यात आली असल्याचे माहे फेब्रुवारी, २०२३ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आले असून यासंदर्भात मुंबईतील जुहू पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने या प्रकरणातील दोषींवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय.
(२) प्रस्तुत प्रकरणी दाखल तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक ०४/०२/२०२३ रोजी पोलीस स्टेशन जुहू, मुंबई येथे भारतीय दंड संहिता कलम ४०९, ३४ अन्वये गु. र. क्र. ५०/२०२३ गुन्हा दाखल करण्यात आला असून प्रकरणाचा पुढील तपास आर्थिक गुन्हे शाखा, मुंबई मार्फत सुरू आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील अनुदानित निवासी आदिवासी आश्रमशाळांमधील ‘पहारेकरी’ पदास वेतनश्रेणी लागू करणेबाबत

**(२०) * १८७४५ श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात स्वयंसेवी संस्थाद्वारे अनुदानित निवासी आदिवासी आश्रमशाळा चालविल्या जात असून, त्या निवासी आश्रमशाळांकरीता शासन निर्णय, दिनांक २३ जानेवारी, २०१४ अन्वये ‘पहारेकरी’ पद मानधनावर मंजूर केले होते व शासन निर्णय दिनांक १८ जून, २०१६ अन्वये मानधन रुपये ३,२००/- वरुन वाढ करुन रुपये ५,०००/- केले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मा.उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ येथे कर्मचारी संघटना व काही पहारेकरी यांनी रिट याचिका क्र.४३००/२०२१ दाखल केली होती. सदर याचिकेचा निकाल दिनांक ११ सप्टेंबर, २०२२ रोजी लागला असून सदरहू निकालात उक्त वेतनश्रेणी दिनांक २ फेब्रुवारी, २०१८ पासून लागू करुन थकबाकीसह इतर लाभ देण्याचे आदेश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने यासंदर्भात शासनाने माहिती घेऊन सदरील निकालानुसार राज्यातील अनुदानित निवासी आश्रमशाळांतील ‘पहारेकरी’ पदास वेतनश्रेणी लागू करणेबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावीत :** (१) व (२) खरे आहे
(३) मा.उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ यांनी पारित केलेल्या आदेशाच्या विरुध्द मा.सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुज्ञा याचिका दाखल करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## महाराष्ट्र राज्यासह १९ राज्यांमधील नागरिकांची ओएलएक्स वरून कोट्यवधी रुपयांची फसवणूक केल्याबाबत

**(२१) * १८४८९ श्रीमती उमा खापरे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.रमेशदादा पाटील, श्री.प्रवीण दटके, श्री.रामदास आंबटकर, श्री.रामराव पाटील :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्यासह १९ राज्यांमधील नागरिकांची ओएलएक्स वरून कोट्यवधी रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी सायबर गुन्हे शाखेने या टोळीच्या प्रमुखासह अन्य साथीदारांना ताब्यात घेतले असल्याची बाब माहे जानेवारी, २०२३ च्या पहिल्या आठवड्यात वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने दोषींवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) सदर प्रकरणी उत्तर प्रादेशिक सायबर पोलीस ठाणे,गुन्हे शाखा, गु.अ.वि. मुंबई येथे गुरक्र.३९/२०२२ कलम ४२०, ४१९, ४६५, ४६७, ४६८, ४७१,१२०(ब) भा.द.वि. सह कलम ६६ (क), ६६(ड) माहिती तंत्रज्ञान अधिनियम २००० अन्वये दिनांक ३०/०८/२०२२ रोजी गुन्हा नोंद करण्यात आला असून सदर गुन्ह्यातील ४ आरोपीना माहे डिसेंबर, २०२२ च्या शेवटच्या आठवड्यात वेगवेगळया दिनांक रोजी राजस्थान, जयपूर, उत्तरप्रदेश येथून अटक करण्यात आली असून गुन्हा तपासाधीन आहे. तसेच सदर ०४ आरोपीचा मुंबई मधील वेगवेगळया पोलीस ठाण्यामध्ये सहभाग असल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## म्हातारपाखाडी, माझगांव ( जि.मुंबई शहर) येथील तुलसी सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या प्रकल्पाची चौकशी करून पात्र कुटुंबांना न्याय देणेबाबत.

**(२२) * १८३२१ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) म्हातारपाखाडी, माझगांव (जि. मुंबई शहर) येथील सीएसका १० जी/ १२४ या भूखंडावर विकासकातर्फे राबविण्यात आलेल्या तुलसी एसआरए सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या पुनर्विकास प्रकल्पात विकासकाने मूळ झोपडीधारक रहिवासी कुटुंबांची संख्या ८४ असताना कागदोपत्री १५५ इतकी दाखवून सुमारे ७१ घरे बनावट कागदपत्रांद्वारे अतिरिक्त दाखवून तेवढ्याच घरांच्या क्षेत्रफळावर मिळणारा अतिरिक्त चटई क्षेत्राचा वापर करुन विकासकाने सदरहू पुनर्विकास प्रकल्पात कोट्यवधी रुपयांचा आर्थिक गैरव्यवहार केल्याचे दिनांक १५ सप्टेंबर, २०२३ रोजी निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू योजनेतील घर क्र. एसएचए ६२/३-१५५ मधील झोपडीधारक प्रताप तेजाळे हे पात्र असतानाही व त्यांनी प्रकल्पासंदर्भात तक्रार केली म्हणून विकासकाने त्यांना एएआरए च्या अधिकाऱ्यांबरोबर संगनमत करून अपात्र ठरवून बेघर केल्याप्रकरणी लोकप्रतिनिधींनी दिनांक ४ ऑगस्ट, २०२१ रोजी मा.मुख्यमंत्री यांना लेखी निवेदन देऊनही अद्याप यावर कोणतीच कार्यवाही झाली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने उक्त प्रकल्प गेली २२ वर्षे सुरु असूनही अद्याप पूर्ण झाला नसल्याने सदर प्रकल्पात झालेली अनियमितता व गैरप्रकार करणाऱ्या संबंधितांवर कारवाई करण्याबाबत तसेच मूळ पात्र झोपडीधारकांना न्याय देऊन बोगस ७९ झोपडीधारकांची घरे जप्त करुन प्रकल्प विनाविलंब पूर्ण करण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंब कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

मुंबई शहर जिल्ह्यातील माझगांव विभागातील क्लस्टर आय डी क्र. E/१५५, भूकर क्र.१० जी/१२४ या मिळकतीवरील २१३२ चौ.मी. क्षेत्रावर माझगाव तुलसीप्रेम एस.आर.ए. सहकारी गृहनिर्माण संस्था (नियोजित) या संस्थेची झोपडपट्टी पुनर्वसन योजना आहे. सदर योजनेचे अंतिम परिशिष्ट-II तत्कालीन सक्षम प्राधिकारी तथा उपजिल्हाधिकारी (अति/निष्का) कुलाबा विभाग यांनी दिनांक ११/०८/२०२१ रोजी निर्गमित केले असून ते एकूण ११९ झोपडीधारकांचे आहे.

आवश्यक ती कागदपत्रे सादर न केल्याने सदर योजनेस पुढील मंजुरी देण्यात आलेली नाही.
(२) अंतिम परिशिष्ट-II मधील अ.क्र.६२ वर शांताबाई भिमा धायकर व राधाबाई कृष्णकांत धायकर हे झोपडीधारक निवासी प्रयोजनार्थ पात्र आहेत. मूळ परिशिष्ट-II मध्ये प्रताप तेजाळे या नावाचा झोपडीधारक नाही. प्रा.राजु तोडसाम, माजी विधानसभा सदस्य यांनी सदरहू प्रकरणाची चौकशी व कारवाई होत नाही, तोपर्यंत झोपडीधारकांना निष्कासित करण्यात येऊ नये, अशी विनंती मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांना दिनांक ०४/०८/२०२१ रोजीच्या पत्रान्वये केली आहे.

माझगांव तुलसीप्रेम एस.आर.ए. सहकारी गृहनिर्माण संस्था (नियोजित) या संस्थेच्या कोणत्याही झोपडीधारकास झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणामार्फत अद्यापपर्यंत निष्कासित करण्यात आलेले नाही, अथवा तशी कोणतीही कार्यवाही प्रस्तावित नाही तसेच भविष्यात देखील प्रकरणी विहीत कार्यपध्दती अवलंबिल्याशिवाय कोणत्याही झोपडीधारकाचे सक्तीच्या उपायाने निष्कासन न करण्याची दक्षता घेतली आहे.
(३) सदर प्रकल्पाबाबतचा DCPR कलम ३३(१०) नुसार वास्तुविशारद श्री.शेवडे यांनी सादर केलेला प्रस्ताव दिनांक ०२/०३/२०२० रोजी स्वीकृत करण्यात आला आहे. तथापि, आवश्यक ती कागदपत्रे सादर न केल्याने सदर योजनेस कोणतीही मंजुरी देण्यात आलेली नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

## राज्यातील प्रलंबित सिंचन प्रकल्पासंदर्भात भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षकांच्या (कॅग) अहवालात जलसंपदा विभागाच्या कारभारावर घेतलेल्या आक्षेपाच्या अनुषंगाने कारवाई करण्याबाबत

**(२३) * १७८६९ श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षकाच्या (कॅग) अहवालात दिनांक ३० डिसेंबर, २०२२ रोजी विधानमंडळात सादर केलेल्या जलसंपदा विभागाच्या कारभारावर आक्षेप घेतले आहेत, हे खरे आहे काय
(२) असल्यास, जलसंपदा विभागाच्या नियोजनशून्य कारभारामुळे सिंचन प्रकल्पांचे नुकसान झाले असून राज्यातील आंधळी (सातारा), पिंपळगांव (सोलापूर), पूर्णा (अमरावती), हरणघाट (चंद्रपूर), सोंड्याटोला (भंडारा) आणि वाघोलीबुटी (चंद्रपूर) या सुमारे रूपये ८५ कोटी खर्चाचे सहा मध्यम सिंचन प्रकल्प २५ वर्षानंतरही पूर्ण करण्यात शासनाला यश आलेले नाही परिणामी या प्रकल्पांची किंमत आता रूपये ६०० कोटीपर्यंत झाली असून काही ठिकाणी धरण आहे, पण त्यात पाणी नाही, अशी परिस्थिती निर्माण झाल्याचा ठपका कॅगने आपल्या सदरहू अहवालाद्वारे ठेवला आहे, हे ही खरे आहे काय
(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने कॅगने आपल्या सदरहू अहवालात जलसंपदा विभागाच्या कारभारावर केलेल्या आक्षेपाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे अंशत: खरे आहे, भारताचे नियंत्रक व लेखापरिक्षक यांचा भुपृष्ठ सिंचनातील परिणामावर निष्पादन लेखा परिक्षण अहवाल ३० डिसेबर, २०२२ रोजी विधानमंडळात सादर करण्यात आला होता. सदर अहवालामध्ये प्रकल्प पूर्ण करण्यास झालेला विलंब, किंमतीतील वाढ, अव्यवहार्य लाभ व्यय गुणोत्तर, सिंचनाचे उद्दिष्ट पूर्ण न होणे, अपुरी पाणी उपलब्धता, अपुरे व्यवस्थापन इ. बाबीवर भाष्य करण्यात आलेले आहे.
(२) हे अंशत: खरे आहे, सदर अहवालात पुढीलप्रमाणे नमूद आहे :-

| | |
|---|---|
| ११ ते २५ वर्षाच्या विलंबाने पूर्ण झालेले प्रकल्प | ०४<br>आंधळी (सातारा), हरणघाट (चंद्रपूर), सोंड्याटोला (भंडारा) आणि वाघोलीबुटी (चंद्रपूर) |
| २० वर्षापेक्षा अधिक काळ लोटून पूर्ण न झालेले प्रकल्प | ०२<br>पिंपळगांव (सोलापूर), पूर्णा (अमरावती), |

नमूद ६ प्रकल्पांचे धरण बांधकाम १००% पूर्ण असून कालव्याद्वारे व उपसाद्वारे एकूण ३८,८२६ हेक्टर सिंचन क्षेत्र निर्मितीचे उद्दिष्टापैकी सद्य:स्थितीमध्ये एकूण ३१,५१० हेक्टर सिंचन क्षेत्र निर्मित झाले आहे. सदर सहा प्रकल्पांस एकूण रुपये ८२.६३ कोटी इतकी मूळ प्रशासकीय मान्यता प्राप्त आहे. सदर प्रकल्पांची सुधारित प्रशासकीय मान्यता एकूण किंमत रुपये ६००.०६ कोटी इतकी आहे.

पाणी उपलब्धता तक्ता (२०१४-२०१५ ते २०२०-२०२१)

| प्रकल्पाचे नांव | दरवर्षी साठवण/उपसा करण्यासाठी प्रस्तावित पाण्याचे प्रमाणे (द.ल.घ.मी.) | प्रत्यक्षात उपलब्ध पाण्याची टक्केवारी |
|---|---|---|
| आंधळी | ९.२७ | २८ ते ८० |
| पिंपळगांव (ढाले) | १२.६६ | ५ ते ९५ |
| पूर्णा | ४१.७५ | ४९ ते ८५ |
| हरणघाट उपसा सिंचन योजना | ४१.५७ | ४ ते ३३ |
| सोंड्याटोला उपसा सिंचन योजना | ६५.३० | २५ ते ६५ |
| वाघोलीबुटी उपसा सिंचन योजना | २४.४२ | १० ते ६५ |

(३) कॅगच्या अहवालात उपस्थित केलेल्या आक्षेपांच्या अनुषंगाने स्पष्टीकरणात्मक ज्ञापने क्षेत्रिय स्तरावरुन मागविण्यात आले असून, त्यानुसार शासन स्तरावरुन योग्य ती कार्यवाही करणे नियोजित आहे. तसेच प्रकल्प पूर्ण करणे, प्रकल्प नियमन, मान्यता याबाबत धोरण/मार्गदर्शक सूचना यापुर्वीच निर्गमित करण्यात आलेले आहेत. त्या खालीलप्रमाणे.

१) बांधकामाधीन सिंचन प्रकल्प लवकर पूर्ण होण्याच्यादृष्टीने प्रकल्प नियोजन, निधी उपलब्धता व बांधकाम व्यवस्थापनाबाबतचे धोरण दिनांक ०८ सप्टेंबर, २०१५ च्या शासन निर्णयान्वये निर्गमित करण्यात आले आहे व त्यानुसार कार्यवाही करण्यात येत आहे.

२) राज्यामध्ये उपसा सिंचन योजना हाती घेण्याबाबत दिनांक २३/११/२०१६ च्या शासन निर्णयान्वये मार्गदर्शक सूचना दिलेल्या आहेत.

३) उपसा सिंचन योजना व प्रकल्पाच्या पाण्याचे योग्य वितरण होण्याच्या अनुषंगाने सिंचन पध्दतीचे शेतकऱ्यांकडून व्यवस्थापन आणि इतर बाबींसाठी महाराष्ट्र शासनाच्या दिनांक १९ मे, २००५ च्या अधिसूचनेद्वारे निर्देश देण्यात आलेले आहेत.

४) दिनांक ४ मे, २००५ रोजीच्या अधिसूचनेद्वारे महाराष्ट्र राज्यातील जलसंपत्तीचे नियमन व व्यवस्थापन करण्याकरीता महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाची स्थापना करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात पूरपरिस्थिती निर्माण झाली असताना क्षेत्रिय वरिष्ठ अधिकाऱ्यांनी मुख्यालय न सोडण्याच्या आदेशाबाबत

**(२४) * १७७०७ श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पावसाळ्यात धरणातील पाणीसाठा वाढल्याने नदीपात्रात मोठ्या प्रमाणात पाण्याचा विसर्ग करावा लागत असल्याने पूरपरिस्थितीचा धोका लक्षात घेता जलसंपदा विभागाच्या क्षेत्रिय वरिष्ठ अधिकाऱ्यांना पावसाळ्यात मुख्यालय सोडू नये असे शासनाने शासन परिपत्रक दिनांक ६ जून, २०२२ रोजी वा त्यादरम्यान काढले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नाशिक जिल्ह्यात माहे सप्टेंबर, २०२२ अखेरीस अतिवृष्टीमुळे गंगापूर व अन्य धरणांतून मोठ्या प्रमाणात पाण्याचा विसर्ग करण्यात येऊन पूरपरिस्थिती उद्‌भवली आणि नदीकाठच्या रहिवाशांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला मात्र यावेळी अधीक्षक अभियंता हे सहलीसाठी परदेश दौऱ्यावर गेल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पूरपरिस्थिती असताना धरणातून पाण्याचा किती विसर्ग करावा या व अन्य तातडीच्या निर्णयासाठी वरिष्ठ अधिकारी हजर नसल्याने गोंधळ निर्माण होऊन झालेल्या नुकसानीबद्दल संबंधित अधिकारी यांची चौकशी करुन त्यांच्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, अशा घटना भविष्यात पुन्हा घडू नयेत आणि नदीकाठच्या रहिवाशांचे जीवित आणि मालमत्ता धोक्यात येऊ नये यासाठी शासनस्तरावरून कोणत्या उपाययोजना करण्यात आल्या वा करण्यात येत आहेत,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

(२) व (३) अंशत: खरे आहे.

नाशिक जिल्ह्यातील गंगापूर व इतर धरणाचे पावसाळी हंगामात संबंधित विभाग व क्षेत्रिय अधिकारी/कर्मचारी यांनी SOP/ROS प्रमाणे धरण परिचालन व्यवस्थित केले आहे. त्यामुळे पूरपरिस्थिती नियंत्रणात होती. सामान्य प्रशासन विभागाचे परिपत्रक दिनांक २९/१२/२०१४ व जलसंपदा विभागाचे परिपत्रक दिनांक ०६/०६/२०२२ मधील तरतूदीनुसार सक्षम प्राधिकरणाच्या परवानगीने तत्कालीन अधीक्षक अभियंता व प्रशासक, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, नाशिक यांनी दिनांक १३/०९/२०२२ ते दिनांक २१/०९/२०२२ या कालावधीत रजा घेऊन स्वखर्चाने खाजगी कारणास्तव परदेश दौरा केला आहे. सदर रजा कालावधीमध्ये श्री.रा.बा.गोवर्धने, कार्यकारी अभियंता, पालखेड पाटबंधारे विभाग, नाशिक यांचेकडे प्राधिकरणाचा अतिरिक्त कार्यभार दिला होता.

सदर प्रकरणी क्षेत्रिय कार्यालयाकडून शासनास अहवाल प्राप्त झाला आहे. याअनुषंगाने दिनांक १९/१२/२०२२ च्या आदेशान्वये तत्कालीन अधीक्षक अभियंता यांची अधीक्षक अभियंता तथा उप सचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई येथे बदलीने पदस्थापना करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही. १ जून ते १५ ऑक्टोबर या पावसाळयाच्या कालावधी दरम्यान विविध स्तरावर पूर नियंत्रण कक्षाची स्थापना केली जाते व सदर कक्षामार्फत धरणातील पाण्याच्या विसर्गाची माहिती वेळोवेळी संबंधित जिल्हा आपत्ती व्यवस्थापन कक्षास पुरविली जाते. तसेच सर्व संबंधित यंत्रणांशी समन्वय साधून आवश्यक उचित कार्यवाही करण्यात येते.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कासारखेडा (ता.आर्वी, जि.वर्धा) येथील धाम नदीवरील पुलाचे बांधकाम करण्याबाबत

**(२५) * १८०५३ श्री.रामदास आंबटकर :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कासारखेडा (ता.आर्वी, जि.वर्धा) येथील धाम नदीवरील पूल अतिवृष्टीमुळे वाहून गेल्याचे माहे जानेवारी,२०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पुलाअभावी परिसरातील नागरिकांना नदीच्या पाण्यातून जीवघेणा प्रवास करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने सदर पुलाचे बांधकाम करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय, अंशत: खरे आहे.

कासारखेडा (तालुका आर्वी जिल्हा वर्धा) येथील सदर पूल वजा बंधारा धाम नदीवर असून धाम प्रकल्पाच्या खालच्या बाजूस ६ किलोमीटर अंतरावर आहे. बंधाऱ्याचे बांधकाम सन १९९२-९३ मध्ये पूर्ण करण्यात आले आहे.

सन २०२२ मधील वर्धा जिल्ह्यात झालेल्या अतिवृष्टी दरम्यान सदर पूल वजा बंधारा वाहून गेला नसून सदर बंधाऱ्याच्या उजव्या बाजूच्या विंगवालच्या लगत असलेल्या माती भरावाचे काम क्षतिग्रस्त झालेले आहे.
(२) होय, हे अंशत: खरे आहे.

धाम नदीपात्रात बांधलेला सदर पूल वजा बंधारा हा कोल्हापूर पध्दतीचा असून सुस्थितीत आहे. सदर पूल वजा बंधाऱ्याचा उपयोग स्थानिक शेतकऱ्यांकडून शेतात येण्या जाण्याकरीता करण्यात येत असून पूलाला जोडणाऱ्या रस्त्याच्या मातीकामाचा भराव वाहून गेल्याने शेतकऱ्यांना बैलगाडी, दुचाकी वाहन नेण्याकरीता अडचण होत असून सद्य:स्थितीत शेतकऱ्यांची पायवाट सुरू आहे. तथापि, परिसरातील नागरिकांना नदीच्या पाण्यातून जीवघेणा प्रवास करावा लागत नसून बैलगाडी/दुचाकी वाहनाने शेतात जाण्याकरीता गैरसोय होते आहे.
(३) सदरहू कामाच्या दुरूस्तीस्तव अंदाजे रुपये ३०.०० लक्ष खर्च अपेक्षित आहे. त्याकरीता सविस्तर अंदाजपत्रक तयार करण्याचे काम क्षेत्रिय स्तरावर प्रगतीपथावर आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पाचोरा (ता.पाचोरा, जि.जळगाव) शहरात विवाहितेचे अश्लिल फोटो प्रसारित करण्याची धमकी देऊन अत्याचार केल्याबाबत

**(२६) * १८०१३ श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पाचोरा (ता.पाचोरा, जि.जळगाव) शहरात विवाहितेचे अश्लिल फोटो प्रसारित करण्याची धमकी देऊन अत्याचार करण्यात आल्याची घटना दिनांक ३ ऑक्टोबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास घडली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने अत्याचार करणाऱ्या दोषी व्यक्तींवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय. दिनांक ०१/०८/२०२१ पासून ते दिनांक २०/०८/२०२२ पर्यंत गुन्हा घडला आहे.
(२) फिर्यादीने दिलेल्या तक्रारीनुसार पाचोरा पोलीस स्टेशन येथे दिनांक ०१/१०/२०२२ रोजी गु.र.नं. ४४६/२०२३ भा.दं.वि. कलम ३७६, ३७६(२)(N), ३२३, ५०६, ५०७, ५०९ आयटी ॲक्ट कलम ६७(अ) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्ह्यातील दोन्ही आरोपीतांना अटक करण्यात आलेली असून आरोपीविरुध्द मा.न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वासंबा (जि.हिंगोली) येथील पोलीस ठाण्याच्या हद्दीमध्ये अवैधरित्या दारु विक्री केली जात असल्याबाबत

**(२७) * १८५३३ डॉ.प्रज्ञा सातव, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.जयंत आसगावकर, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वासंबा (जि.हिंगोली) येथील पोलीस ठाण्याच्या हद्दीतील महादेव चिंचोली येथे अवैध दारु विक्री केली जात असल्याचे माहे फेब्रुवारी, २०२३ च्या दुसऱ्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यामुळे संतप्त महिला व ग्रामस्थांनी या गावात दारुबंदी करावी या मागणीसाठी जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयासमोर ठिय्या आंदोलन करुन मा.पोलीस अधीक्षक यांना निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी करुन सदर गावात दारुबंदी करुन येथील अवैध दारुविक्रेत्यांवर कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) दिनांक १०/०२/२०२३ रोजी मौजे महादेव चिंचोली गावात किर्तनाच्या कार्यक्रमात दारु पिऊन गोंधळ करणाऱ्या व्यक्तीची ग्रामस्थांनी पोलीस स्टेशन येथे तक्रार केली असता पोलीस घटकाने वेळीच प्रतिसाद न दिल्याने सदर गावातील ग्रामस्थ पोलीस घटकाची व दारु पिऊन किर्तनात गोंधळ करणाऱ्या व्यक्तीची तक्रार करण्यासाठी पोलीस अधीक्षक, हिंगोली यांचे कार्यालयात गेले होते.
(३) सदर प्रकरणात सविस्तर चौकशी करुन गावात अवैध दारु विक्री करणाऱ्या एका आरोपीविरुध्द गु.र.क्र. १५/२०२३ भा.दं.वि कलम ५०४, ५०६ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपीविरुध्द कलम १५१ (३) सी.आर.पी.सी. प्रमाणे प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली आहे.

तसेच वरील घटनेमध्ये ग्रामस्थांनी डायल नंबर ११२ वर केलेल्या तक्रारीची कर्तव्यावर असलेल्या पोलीस कर्मचाऱ्यांनी तात्काळ दखल न घेतल्याने दोन पोलीस कर्मचाऱ्यांवर निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे व एका पोलीस उप निरिक्षकास कारणे दाखवा नोटीस देण्यात आली आहे.

अवैध दारु विक्रेत्यांची गोपनीय माहिती काढून तसे आढळून आल्यास त्यांचेवर कारवाई करण्यात येत आहे तसेच भविष्यात चिंचोली गावात अवैध दारु विक्री होणार नाही याची दक्षता घेण्यात येत आहे.

हिंगोली पोलीसांमार्फत जिल्ह्यातील अवैध दारु विक्री करणाऱ्या लोकांवर सन २०२२ मध्ये १४९० केसेस दाखल करण्यात आले असून माहे फेब्रुवारी, २०२३ अखेर २५५ केसेस दाखल करण्यात आले आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पाताळगंगा (जि.रायगड) परिसरातील कालव्यांची दुरूस्ती करण्याबाबत

**(२८) * १८३७५ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पाताळगंगा (जि.रायगड) परिसरातील माजगाव, आंदिवली, वारद, पौध आणि अन्य आदिवासी वाड्यांमध्ये शेतीला बारमाही पाणी मिळावे यासाठी कालवे तयार करण्यात आले असून या कालव्यांमध्ये पाताळगंगा नदीचे पाणी सोडले जात असूनही गेल्या पाच वर्षांपासून हे कालवे कोरडे पडले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पाटबंधारे विभागाने केलेल्या दुर्लक्षामुळे गेल्या पाच वर्षांपासून सदर परिसरातील शेतकऱ्यांना उन्हाळ्यात शेती पिकवता येत नसल्याने त्यांची आर्थिक परिस्थिती बिकट झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या कालव्यांवर कोट्यवधी रुपयांचा खर्च करण्यात आला असून पाच वर्षांहून अधिक कालावधी उलटूनही सदर कालवे कोरडे राहण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,चौकशीच्या अनुषंगाने सदर कालव्यांची दुरुस्ती करण्यात यावी अशी शेतकऱ्यांची मागणी असूनही उक्त कालव्याची दुरुस्तीचे कामे प्रलंबित ठेवणाऱ्या दोषी अधिकारी तथा कर्मचाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

रायगड जिल्ह्यातील खालापूर तालुक्यातील खरसुंडी गावाजवळ पाताळगंगा नदीवर सन १९७६ मध्ये बांधण्यात आलेला खरसुंडी वळण बंधारा या योजेनेच्या लाभक्षेत्रात सदर गांवे ही खोपोली ते पाताळगंगा या औद्योगिक क्षेत्रात येतात.

कालवे नादुरूस्त झालेले आहेत. तथापि, गेल्या ५ वर्षापासून शेतकऱ्यांकडून सिंचनासाठी पाणी मागणी नसल्यामुळे कालव्यात पाणी सोडण्यात येत नाही.

(२) हे खरे नाही.

सदर परिसरातील शेतकऱ्यांकडून मागील ५ ते ६ वर्षापासून सिंचनासाठी पाणी मागणी प्राप्त झालेली नाही.

(३) मागील ५ वर्षात खरसुंडी वळण बंधाऱ्याच्या दुरूस्तीकरीता रुपये २९.११ लक्ष खर्च झालेला असून कालवा दुरूस्तीसाठी खर्च करण्यात आलेला नाही.

पावसाळ्यात येणाऱ्या पूर परिस्थितीमुळे सदर कालव्याचा भराव बऱ्याच ठिकाणी नादुरूस्त असून कालव्यावरील बांधकामे ना-दुरूस्त झालेली आहेत. तसेच शेतकऱ्यांची सिंचनासाठी पाणी मागणी नसल्याने कालव्यातून पाणी सोडण्यात येत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

कालव्याच्या माती भरावाच्या दुरूस्तीची कामे सन २०२२-२३ मधील यांत्रिकी विभागामार्फत करण्यात येणाऱ्या पाखरण कार्यक्रमामध्ये अंतर्भूत करण्यात आलेले असून सदर कामे यांत्रिकी विभागामार्फत जून, २०२३ अखेर पूर्ण करण्याचे नियोजन आहे. तसेच खरसुंडी वळण बंधारा मजबुतीकरण व त्याच्या कालव्यावरील बांधकामांची दुरूस्तीची कामे सन २०२३-२४ च्या प्रापणसूचीत प्रस्तावित करण्यात येत असून सदर कामे सन २०२३-२४ या आर्थिक वर्षामध्ये निधी उपलब्धते नुसार पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## उल्हासनगर (जि.ठाणे) येथील व्याजावर पैसे देणाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत

**(२९) * १८४६१ श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उल्हासनगर (जि.ठाणे) येथील तरुणाने घेतलेल्या कर्जाच्या ४० टक्के व्याजाच्या तगाद्याला कंटाळून सोशल मिडीयावर व्हिडीओ व्हायरल करून दिनांक २४ जानेवारी, २०२३ रोजी आत्महत्या केल्याची घटना घडली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उल्हासनगर येथील कँप क्र. १ परिसरातील एका महिलेने व्याजावर पैसे देणाऱ्यांच्या जाचाला कंटाळून फिनेल पिऊन आत्महत्या करण्याचा प्रयत्न दिनांक २७ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त दोन्ही घटनांची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे आणि व्याजावर पैसे देऊन सर्वसामान्य नागरिकांना त्रास देणाऱ्यांवर कारवाई तसेच त्यावर पायबंद घालण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) उल्हासनगर येथील व्यक्तीने काही व्यक्तींनी आत्महत्येस प्रवृत्त केल्याचे नमूद करुन दिनांक २५/०१/२०२३ रोजी रेल्वेखाली आत्महत्या केली असून यानुषंगाने कल्याण रेल्वे पोलीस ठाणे येथे अपमृत्यू क्रमांक १६/२०२३ सीआरपीसी १७४ दिनांक २६/०१/२०२३ रोजी नोंदविण्यात आला आहे.

(२) होय, हे खरे आहे.

उल्हासनगर येथील महिलेने अन्य एका महिलेकडून हातउसने घेतलेले पैसे वेळेवर न दिल्याने शिवीगाळ करुन धमकी दिल्याने सदर महिलेने थोडेसे फिनेल पिल्यामुळे तिच्या पतीने दिलेल्या तक्रारीवरुन दिनांक २७/०१/२०२३ रोजी अदखलपात्र गु.र.नं. १७३/२०२३ कलम ५०४, ५०६ भा.दं.वि. दिनांक २७/०१/२०२३ रोजी गुन्हा दाखल करण्यात आहे. तसेच, फिर्यादी महिलेच्या जीवास क्षती/इजा पोहचेल असे कुटुंबियासमोर कृत्य करुन नुकसान पोहोचविण्याची भिती घातल्याने फिर्यादी महिलेने दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने सहा आरोपींविरुध्द दिनांक २८/०२/२०२३ रोजी उल्हासनगर पोलीस स्टेशन येथे गु.र.नं.१६४/२०२३ कलम ३८४, ३८५, ५०४, ५०६, ३४ भा.दं.वि. प्रमाणे महाराष्ट्र सावकारी (नियमन)

अधिनियम, २०१४ कलम ३९, ४५ सह गुन्हा नोंद करण्यात आला आहे. यापैकी तीन आरोपींना अटक करण्यात आली असून अन्य तीन आरोपींचा शोध सुरु आहे.
(३) उपरोक्त दोन्ही प्रकरणे पोलीस तपासावर आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**बोईसर (जि.पालघर) पोलीस ठाण्याच्या हद्दीतील अवैध धंद्यावर कारवाई करण्याबाबत**

**(३०)** * **१८४७३ श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बोईसर (जि.पालघर) पोलीस ठाण्याच्या हद्दीत अवैध धंदे करणारे माफिया पोलिसांना न जुमानता राजरोसपणे मटका, जुगार, सट्टा यांसारखे अवैध धंदे सुरु ठेवत असल्याची बाब दिनांक १३ फेब्रुवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बोईसरच्या भंडारवाडा आणि रेल्वे स्थानकासमोरील बाजारात सुरु असलेल्या अवैध धंद्यांमुळे महाविद्यालयीन विद्यार्थी आहारी जाऊन त्यांचे शैक्षणिक भवितव्य धोक्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे आणि बोईसर पोलीस ठाण्याच्या हद्दीत सुरु असलेल्या अवैध धंद्यावर, तसेच या अवैध धंद्यांना वरदहस्त देणाऱ्या संबंधित पोलीस अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) हे खरे नाही.
(३) बोईसर पोलीस ठाणे हद्दीतील अवैध धंद्याची माहिती मिळवून/ तक्रार प्राप्त होताच संबंधितांविरुध्द वेळोवेळी कारवाई करण्यात येते. बोईसर पोलीस ठाणे कार्यक्षेत्रात सन २०२२ मध्ये ५२ अवैध धंद्यांच्या ठिकाणी छापे टाकून ६७ आरोपींना अटक करण्यात आली आहे, तर सन २०२३ मध्ये फेब्रुवारी अखेर १२ अवैध धंद्यांच्या ठिकाणी छापे टाकून १३ आरोपींना अटक करण्यात आली आहे. अवैध धंद्यांचे समूळ उच्चाटन करणेकामी पोलिसांच्या वतीने प्रयत्न करण्यात येत आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ (ता.किनवट, जि.नांदेड) मधील विविध योजनांसाठी पात्र लाभार्थी अभावी निधी शासनाला परत करण्यात आल्याबाबत**

**(३१)** * **१८६४६ श्री.रमेशदादा पाटील, श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ (ता.किनवट, जि.नांदेड) मधील विविध योजनांसाठी पात्र लाभार्थी न मिळाल्याने मागील वर्षाचे रुपये २८ लाख शासनाला परत करण्यात आल्याची बाब माहे जानेवारी, २०२३ च्या तिसऱ्या आठवड्यात व त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शबरी विकास महामंडळाच्या विविध योजनांची माहिती गाव, वाडी, वस्ती, पाड्यांपर्यंत पोहोचू न शकल्याने अनेक आदिवासी सुशिक्षित बेरोजगार तरुण या योजनांपासून निधी असूनही वंचित राहिले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने शबरी विकास महामंडळाच्या विविध योजना गाव, वाडी, वस्तीपाड्यांपर्यंत सक्षमपणे पोहचवून सदर निधी शासनास परत करावा लागणार नाही तसेच सुशिक्षित बेरोजगारांना लाभ देण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय?

**डॉ. विजयकुमार गावीत :** (१) व (२) हे खरे नाही.

शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळामार्फत वैयक्तिक कर्ज लाभाच्या योजनेच्या प्रसिध्दीबाबत राज्यातील सर्व जिल्ह्यात ३ वेळा स्थानिक वर्तमान पत्रात जाहिरात देण्यात आली होती. तसेच महामंडळाच्या संकेतस्थळावर ऑनलाईन अर्ज करण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली होती. त्याचप्रमाणे संकेतस्थळावर ऑफलाईन इच्छुक उमेदवारांकरीता योजनेचा नमूना अर्ज उपलब्ध करुन देण्यात आला होता.

नांदेड, हिंगोली व परभणी जिल्ह्यातील एकूण पात्र ३५ लाभार्थ्यांना वैयक्तिक कर्ज योजनेचा लाभ देण्यात आला आहे.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात विशेषत: सांगली जिल्ह्यातील खाजगी सावकारांच्या अत्याचारामुळे शेतकऱ्यांच्या आत्महत्त्या होत असल्याबाबत

**(३२) * १८६६१ श्रीमती उमा खापरे, श्री.रमेशदादा पाटील, श्री.निलय नाईक :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात विशेषत: पलूस (जि.सांगली) तालुक्यातील खाजगी सावकारांच्या अत्याचाराला कंटाळून कित्येक शेतकऱ्यांनी जीवन संपविले असल्याने अनेक कुटुंबे रस्त्यावर आल्याची बाब माहे फेब्रुवारी, २०२३ च्या पहिल्या आठवड्यात वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, खरे आहे काय,
(२) असल्यास, तत्कालीन गृहमंत्री यांनी राज्यातील सावकारी मोडीत काढण्यासाठी आक्रमक भूमिका घेतली होती मात्र आता पुन्हा एकदा सावकारांविरुध्द पलूस तालुक्यात आणि राज्यात विशेष मोहीम राबवून शेतकऱ्यांना त्रास देणाऱ्या खाजगी सावकारांना पायबंद घालण्याची आवश्यकता आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, दुधोंडी येथील खाजगी सावकारांवर कुंडल पोलीस ठाण्यात सावकारीचा गुन्हा दाखल असतानाही पिडीतांना धमकावले जात असून त्याकडे शासन दुर्लक्ष करीत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने खाजगी सावकारांच्या अत्याचारातून शेतकऱ्याला न्याय देण्यासाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे काय,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

(२) महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम, २०१४ अंतर्गत राज्यात, सांगली जिल्ह्यात व पलुस तालुक्यात गेल्या दोन वर्षात करण्यात आलेली कारवाई खालीलप्रमाणे आहे :-

| वर्ष | महाराष्ट्र राज्य | सांगली जिल्हा | पलुस तालुका |
|---|---|---|---|
| | दाखल गुन्हे | | |
| २०२१ | १३५ | ३५ | ०३ |
| २०२२ | १३६ | ३५ | ०१ |
| फेब्रुवारी, २०२३ अखेर | ०५ | ०१ | ०१ |

(३) दुधोंडी, ता.पलूस, जिल्हा सांगली येथे माहे जानेवारी, २०२३ मध्ये अवैध सावकारीबाबत दोन आरोपींविरुध्द कुंडल पोलीस ठाणे, जिल्हा सांगली येथे गु.र.नं. १०/२०२३, भारतीय दंड संहिता कलम ४५२, ५०७, ५०४, ५०६, ३४ सह, महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम, २०१४ चे कलम ३९, ४५ याप्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यामध्ये गुन्हा दाखल झाल्यानंतर पिडीतांना धमकावल्याची तक्रार प्राप्त नाही.

(४) सांगली जिल्ह्यात सावकारी व्यवसायावर योग्य नियंत्रण ठेवण्याच्या उद्देशाने जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली त्रिसदस्यीय समितीमार्फत आढावा घेण्यात येत आहे. तसेच बेकायदेशीर सावकारीतून पिडीत व्यक्तीने पोलीस अधीक्षक कार्यालयात समक्ष तक्रार देण्याबाबत वृत्तपत्रात बातमी प्रसिध्द करुन आवाहन करण्यात आले आहे.

याप्रमाणे राज्यात देखील बेकायदेशीर सावकारांच्या विरुध्द तक्रारी प्राप्त होताच अशा प्रकारची कारवाई करण्यात येते.

(५) विलंब झालेला नाही.

-----------------

## म्हाडाच्या जुन्या इमारतींना जादा चटईक्षेत्र निर्देशांक मिळणेबाबत

**(३३) * १८७६० श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील गरजूंना म्हाडाची घरे वाजवी दरात उपलब्ध करुन देण्यासाठी तत्कालीन गृहनिर्माण मंत्री यांनी म्हाडाच्या जुन्या इमारतींचा पुनर्विकास जलदगतीने होण्यासाठी तसेच जादा चटईक्षेत्र निर्देशांक मिळण्यासाठी तत्कालीन नगरविकास मंत्री यांना प्रस्ताव पाठविला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, म्हाडाच्या जुन्या इमारतींचा पुनर्विकास होण्यासाठी नगरविकास विभागाने जुन्या इमारतीच्या पुनर्विकासाबाबत अधिसूचना निर्गमित करुन त्या अधिसूचनेमध्ये टिळकनगर सीटीएस क्रमांक १८३२ चेंबूर ऐवजी किरोळ अशी नोंद केली आहे, हे ही खरे काय ?

(३) असल्यास, टिळकनगर सीटीएस क्रमांक १८३२ हे चेंबूर येथे असूनही या अधिसूचनेमध्ये किरोळ हे घाटकोपर येथे असतानाही म्हाडाने टिळकनगर चेंबूर येथील सी.टी.एस. क्रमांक १८३२ इमारत क्रमांक १२० येथील इमारतीच्या पुनर्विकासासाठी मान्यता दिली आहे, तसेच इमारत क्रमांक १२० येथील इमारतीच्या पुनर्विकासामध्ये विकासक बदलल्याने म्हाडाच्या पुनर्विकास इमारतीची जबाबदारी घेण्यास कोणीही तयार नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, म्हाडाच्या पुनर्विकास इमारत क्रमांक १२० मध्ये गरजूंना घरे न मिळाल्याने त्या पुनर्विकास इमारतीत घरे मिळण्यासाठी रेरा या प्राधिकरणात अनेक लोकांनी याचिका दाखल केल्या आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने म्हाडाच्या जुन्या इमारतींचा पुनर्विकास जलदगतीने तसेच जादा चटईक्षेत्र निर्देशांक मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) ते (४) बृहन्मुंबई मधील म्हाडाच्या ११४ अभिन्यासासाठी नगरविकास विभागाच्या दिनांक २३/०५/२०१८ च्या अधिसूचनेनुसार म्हाडास नियोजन प्राधिकरणाचे अधिकार प्रदान केले आहेत. त्यामध्ये टिळकनगर सी.टी.एस. क्रमांक १८३२ चेंबूर ऐवजी किरोळ गांव असे नजरचुकीने दर्शविले असल्याची वस्तुस्थिती आहे.

टिळक नगर, चेंबूर येथील नगर भूमापन क्रमांक १८३२ वरील इमारत क्रमांक १२० ही म्हाडा वसाहतीतील/म्हाडा अभिन्यासातील असल्याने, या इमारतीच्या पुनर्विकासास म्हाडाने मंजूरी दिलेली आहे.

उक्त इमारत क्र. १२० करीता नियुक्त केलेल्या विकासकाने विक्री घटकातील काही सदनिकांची विक्री केली होती. सदर सदनिका खरेदी केलेल्या खरेदीदारांनी त्यांच्या सदनिकांचा ताबा वेळेत प्राप्त न झाल्यामुळे महाराष्ट्र स्थावर संपदा नियामक प्राधिकरण(महारेरा) यांच्याकडे तक्रारी केल्या आहेत.

दिनांक २३/०५/२०१८ च्या अधिसूचनेत न.भू.क्र.१८३२ हा किरोळ गाव येथे दाखविण्यात आल्याची नोंद दुरुस्त करून घेण्याची आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल.

(५) बृहन्मुंबई म्हाडाच्या जून्या वसाहतीचा पुनर्विकास जलद गतीने होण्यासाठी विनियम ३३(५) अंतर्गत :-

१) नगरविकास विभागाची अधिसूचना दिनांक ०३/०७/२०१७ अन्वये, ४००० चौ. मी. वरील भूखंडासाठी ४.०० चटईक्षेत्र निर्देशांक मंजूर करण्यात आला. त्यापैकी ३.०० चटईक्षेत्र निर्देशांक अधिमुल्यावर आधारित व त्यावरील १.०० चटईक्षेत्र निर्देशांक गृहसाठ्याच्या स्वरूपात मंजूर करण्यात आला.
२) नगरविकास विभागाची अधिसूचना दिनांक २०/०८/२०१९ अन्वये दिनांक ०३/०७/२०१७ च्या अधिसूचनेन्वये निर्धारित केलेल्या अधिमुल्याच्या दरात २ वर्षासाठी सवलत देण्यात आली.
३) नगरविकास विभागाची अधिसूचना दिनांक १८/०८/२०२१ अन्वये, उपरोक्त नमूद ३.०० चटईक्षेत्र निर्देशांक हा गृहसाठा किंवा अधिमूल्य यापैकी एकाची निवड करण्यास संस्थेस/ विकासकास मुभा देण्यात आली आहे.
४) नगरविकास विभागाची अधिसूचना दिनांक १६/११/२०२२ अन्वये, म्हाडाच्य वसाहतीमधील ४००० चौ.मी. पेक्षा मोठ्या क्षेत्राच्या भूभागाच्या विकासास चालना देण्यासाठी, उक्त ४००० चौ. मी. पेक्षा मोठ्या क्षेत्रास (१८ मिटर रूंदीचा रस्ता नसेल तेथे) देखील अधिमुल्यावर आधरित पुनर्विकासास मंजूरी देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

-----------------

## विक्रमगड ( जि.पालघर) तालुक्यातील पोलीस पाटलांची रिक्त पदे भरण्याबाबत

**(३४) * १८२७९ श्री.प्रसाद लाड, श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विक्रमगड (जि.पालघर) तालुक्यातील आदिवासी गावामधील पोलीस पाटलांच्या ६० मंजूर पदांपैकी २७ गावातील पोलीस पाटलांची पदे मागील काही वर्षापासून रिक्त आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, २७ गावांतील पोलीस पाटील पदाचा कार्यभार अन्य गावातील पोलीस पाटलावर अतिरिक्त कार्यभार म्हणून सोपविण्यात आल्याने पोलीस पाटलावर कामाचा अतिरिक्त ताण पडत असल्याने या गावातील ग्रामस्थांना विविध दाखल्यासाठी अनेक गंभीर समस्यांना सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू २७ गावातील पोलीस पाटलांची रिक्त पदे विनाविलंब भरण्यात यावी म्हणून मागील २ वर्षापासून सातत्याने मा.मुख्यमंत्री, मा.गृहमंत्री, जिल्हा पोलीस प्रमुख, जिल्हाधिकारी, पालघर आदींकडे मागणी  करण्यात आलेली आहे, हे खरे आहे काय

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने २७ गावातील पोलीस पाटलाची रिक्त पदे भरण्याच्यादृष्टीने निर्णय घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहेत,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) याबाबत जिल्हाधिकारी, पालघर यांच्याकडे निवेदन प्राप्त झाले आहे.

(४) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग दिनांक ०१/०२/२०२३ नुसार अनूसुचित क्षेत्रातील (PESA) १७ संवर्गातील सरळसेवेची पदे भरण्याबाबत मार्गदर्शक सूचना दिल्या असून त्याप्रमाणे पुढील कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## चोपडा (ता.चोपडा, जि.जळगाव) येथे सहा बनावट पिस्तुले व जिवंत काडतुसांसह लाखोंचा मुद्देमाल जप्त झाल्याबाबत

**(३५) * १८०१५ श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चोपडा (ता.चोपडा, जि.जळगाव) येथे सहा बनावट पिस्तुले २४ जिवंत काडतुसांसह सुमारे लाखोंचा मुद्देमाल जप्त केल्याची घटना दिनांक २९ ऑक्टोबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास घडली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने संबंधितांवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) सदर घटना चोपडा शहर पोलीस ठाणे हद्दीत दिनांक १७/०८/२०२२ रोजी घडली आहे. प्रस्तुत प्रकरणी चोपडा शहर पोलीस ठाणे, जि.जळगाव येथे गु.र.क्र. ३३६/२०२२ भा.दं.वि. कलम ३४ सह शस्त्र अधिनियम, १९५९ मधील कलम ३, ७ व २५, अन्वये सहा आरोपींविरुध्द गुन्हा दाखल केला आहे.

सदर प्रकरणी ६ गावठी पिस्टल, ३० जिवंत काडतुस, ४ मोबाईल फोन व १ चार चाकी वाहन असा एकूण रुपये ३७,३७,०००/- इतक्या किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला असून ५ आरोपींना अटक करण्यात आली आहे. १ आरोपी फरार आहे. सदर आरोपींविरुध्द मा.न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले असून प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबई – अहमदाबाद महामार्गावरील मनोर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील धाब्यांवर डांबर, डिझेल, केमिकल, लोखंडी सळ्यांची बेकायदेशीरपणे खरेदी – विक्री सुरु असल्याबाबत

**(३६) * १८४७४ श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई – अहमदाबाद महामार्गावरील मनोर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील धाब्यांवर राजरोसपणे डांबर, डिझेल, केमिकल, लोखंडी सळ्या इ. ची बेकायदेशीरपणे खरेदी – विक्री सुरु असल्याची बाब दिनांक १३ फेब्रुवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय;
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे आणि मुंबई – अहमदाबाद महामार्गावरील मनोर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील धाब्यांवर सुरु असलेल्या डांबर, डिझेल, केमिकल, लोखंडी सळ्या इ.ची बेकायदेशीरपणे खरेदी – विक्रीस प्रतिबंध करण्याबाबत, तसेच या अवैध धंद्यांना सहकार्य करणाऱ्या संबंधित पोलीस अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे;
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

तथापि, दिनांक ३१/०१/२०२३ रोजी तहसिलदार, पालघर आणि पोलीस ठाणे, मनोर यांच्या संयुक्त कारवाईमध्ये मुंबई-अहमदाबाद महामार्गावर असलेल्या अमन धाब्यावर ज्वलनशील द्रव पदार्थाची साठवणूक व विक्री होत असल्याचे आढळून आले. त्याबाबत मनोर पोलीस ठाणे, पालघर येथे दिनांक ०१/०२/२०२३ रोजी गु.र.क्र. १६/२०२३ भा.दं.वि. कलम २८५, ३४, सह जीवनावश्यक वस्तु अधिनियम १९५५ चे कलम ३ व ७ अन्वये तीन आरोपींविरोधात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदर गुन्हयाचा पुढील तपास सुरू आहे.

(२) मनोर पोलीस ठाणे हद्दीत सन २०२२ मध्ये अवैध डिझेल साठवणूक व विक्री प्रकरणी १० छापे टाकून १२ आरोपींना अटक व लोखंडी सळई चोरी करुन विक्री प्रकरणी ०१ छापा टाकून ०१ आरोपीस अटक अशी कारवाई करण्यात आली आहे. अशा अवैध धंद्यांना सहकार्य करण्यात पोलीस अधिकाऱ्यांचा सहभाग असल्याचे आढळून आले नसल्याने कारवाई करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**विधान भवन :** **राजेन्द्र भागवत**

**मुंबई.** **प्रधान सचिव,**

**महाराष्ट्र विधानपरिषद**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.